

# श्री साईलीला

जुलै किं. ५० न. पैसे १९६

स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

मनुष्य जन्मास येऊन ज्यानें आत्महित साधलें नाहीं त्यानें मातेला व्यर्थ शिणविली असेंच म्हणावें लागेल. संतांच्या सहवास करून आपलें कल्याण साधण्याचा मार्ग प्रत्येकानें स्वीकारला पाहिजे. मनुष्यप्राणी जन्मास येतो तेव्हांच तो मरणाच्या मार्गानें वाटचाल करीत असतो. मग आज हें जग सोडून गेला काय किंवा उद्यां परवां गेला काय, त्यांत कसला आला आहे फरक! मी या जगांत कायमचा रहायला आलों आहें, अशा समजुतीनें जो वागतो त्याची शेवटी फसवणूक होते. मला उद्यां निरोप घ्यावयाचा आहे, अशाच भावनेनें प्रत्येकानें या जगांत वावरावें. हा देह म्हणजे काळाचें भक्ष आहे. काळ काय वाटेल तेव्हां झडप घालील व घेऊन जाईल याचें स्मरण सतत ठेवावें. यासाठीं प्रपंचांत नेहमीं सावधानतेनें वागावें. कोणाला तोडूं नये व अहंकार बाळगूं नये. प्रपंच सोडून चालणार नाहीं. तो योग्यप्रकारें व सावधतेनें केलाच पाहिजे. प्रपंच नेटका करावा एवढेंच नव्हे तर जन्माला येऊन पुरुषार्थही गाजवावा व सर्वांकडून मला रे मला म्हणवून घ्यावें.

—श्रीसाईसच्चरित


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४० वें ] जुलै १९६१ [ अंक ४ था

: संपादक :

गो. वि. क्षीरसागर

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

'साई निकेतन,' व्हिन्सेंट रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी,

दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

मुमुक्षु जनांना आणि उपासकांना परमेश्वरावर विश्वास ठेवण्यास सबळ असा पुरावा देतां येणें हें आमच्या आवाक्याच्या बाहेर आहे. भक्तजनांकडून येणाऱ्या चौकशी-वजा पत्रांवरून व भेटीवरून आम्ही कांहीं ठोकताळे मांडले आहेत. चौकशीचें पृथक्करण करतांना असें दिसून येते कीं, श्री बाबांचें आम्हांस दर्शन झालें आहे काय? किंवा श्रीबाबांचा आम्हांस साक्षात्कार झाला आहे काय? अशी पत्रांची विभागणी करतां येईल. अशा भक्तजनांना व उपासकांना आमची एवढीच विनंति आहे कीं, श्रीबाबांचें सान्निध्यांत राहून आम्हांस अद्याप साक्षात्कार झाला नाहीं हें आम्ही प्रांजलपणें कबूल करतों. नुसतें सान्निध्यांत असणें म्हणजे पुरेशी योगसाधना झाली असें समजण्याचें कारण नाहीं; परमेश्वरी साक्षात्कार होण्यास लागणारी निस्सीम भक्ति, मनाची एकाग्रता व चिंतन यांची जरूरी आहे. ही गोष्ट उपासकानें लक्षात घेतली पाहिजे. साक्षात्कार होण्यास लागणारी पात्रता मिळविणें ही अत्यंत कठीण गोष्ट आहे. व ती उपासनेचें बल जितकें प्रबल असेल त्यावर अवलंबून राहील. परमेश्वराचें अस्तित्व हें सर्व धर्मांचें अधिष्ठान आहे आणि परमेश्वर कल्पना ही मनुष्य मात्रास सुचली व अनुभवास आली ह्यामुळें परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल निराळा पुरावा देण्याची जरूरी नाहीं.

संत तुकोबानें म्हटलें आहे कीं ' जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले । तोचि साधू ओळखावा । देव तेथेंची जाणावा ॥

दुसरा एक वर्ग असें सुचविणारा आहे कीं, आमची विनंती श्री बाबांचे कानावर घालून श्री बाबांचा आदेश आम्हांस कळवावा. आमची उपासकांस व भक्तांस एवढीच विनंती आहे कीं, आपण पत्र पाठऊन जो मानसिक शांतता मिळवूं शकाल तीच आपल्या उदयास कारणीभुत होईल. आम्ही विनयपूर्वक एवढेंच सांगूं इच्छितो कीं, बाबांनीं भक्ताना जो उपदेश केला त्याचे सार हेंच आहे कीं,

**माझा जो जाहला काया-वाचा-मनीं । तयाचा मी ऋणी सर्व काळ ।**
**साई म्हणे तोचि तोचि झाला धन्य । झाला जो अनन्य माझ्या पायीं ॥**

हा उपदेश प्रत्येक भक्तानें आपल्या अंतःकरणावर कोरून ठेऊन तो आचरणांत आणण्यासाठीं अहर्निश झटणें, हाच आपल्या कल्याणाचा मार्ग आहे.




## बाळंतपण निर्विघ्नपणें पार पडलें

अहमदाबाद येथें श्रीसाईभक्त मंडळ या नांवाची एक संस्था आहे. त्या ठिकाणीं श्रीसाईबाबांच्या फोटोचें नित्य पूजन, भजन, आरत्या इत्यादि कार्यक्रम होतात. श्री. हसमुखलाल वाडीलाल बॅंकर (राहणार ५०९,लखपटेल रस्ता संकडीशेरी,अहमदाबाद) या नांवाचे एक गृहस्थ त्या मंडळाचे सभासद आहेत. ते श्रीसाईबाबांचे अलिकडचे भक्त आहेत. सुमारें ९।१० महिन्यांपूर्वीची गोष्ट. यांचें कुटुंब गरोदर होतें. ही चौथी खेप होती. आतांपर्यंत तीन प्रसूतीच्या वेळेस त्यांचे कुटुंबास कोणत्याही प्रकारचा त्रास झाला नव्हता. परंतु ह्यावेळेस त्यांचे कुटुंबाची तब्येत अगदींच खराब झाली होती व ऑपरेशनशिवाय ही वेळ निभावणें शक्य दिसत नाहीं असें त्यांच्या डॉक्टरांचें मत पडलें. ऑपरेशनमध्येंही धोका होता. तेव्हां श्री. हसमुखलाल घाबरून गेले. त्यांनीं श्रीसाईबाबांची प्रार्थना केली कीं, ऑपरेशनशिवाय त्यांचे कुटुंबाची बाळंपणांतून सुटका व्हावी व तसें जर झालें तर शिर्डीस जाऊन श्रीबाबांचें दर्शन घेऊं असा त्यांनीं नवस केला. त्यानंतर त्यांनीं मंडळांत बाबांची उदी ठेवलेली असे त्यांतील थोडीशी उदी आपले कुटुंबास खाण्यास दिली. ते बाबांचे भजन एकसारखे करूं लागले. सुमारें ५।६ दिवसांनीं प्रसूतीची वेळ अगदीं जवळ येतांच त्यांचें कुटुंब श्रीसाईबाबांचें नांव घेऊन दवाखान्यांत गेले व आश्चर्याची गोष्ट अशी कीं, गेल्याबरोबर अवघ्या १५।२० मिनिटांत कांहींही त्रासाशिवाय त्यांची सुखरूप सुटका झाली. ऑपरेशनची जरूरच पडली नाहीं.

× × ×

## मी संकटमुक्त कसा झालों ?

वरील गृहस्थांचे श्री. हसमुखलाल नन्दलाल रावळ ( राहणार–सदामाता स्ट्रीट, सांकडीशेरी, अहमदाबाद ) ह्या नांवाचे एक मित्र आहेत. हे मित्र श्रीसाई-बाबांचे एक निःस्सीम भक्त कसे बनले ह्याची हकीकत श्री. बॅंकर यांनीं सांगितली ती अशी—

श्री. रावळ ह्यांना मुतखड्यामुळें ( stone ) लघ्वीचा अत्यंत त्रास होत असे. पुष्कळ उपचार केले पण गुण नाहीं. अखेर डॉक्टरांनीं ऑपरेशन करून घेण्यास सांगि-तलें. श्री. रावळ घाबरून गेले. ह्या वेळपावेतो श्रीसाईबाबांबद्दल त्यांना ऐकून माहिती

होती. पण श्रद्धा बसली नव्हती. परंतु डॉक्टरांनीं ऑपरेशनचें नांव काढतांच ह्या संकटांतून श्रीबाबाच आपणांस सोडवतील असें वाटून त्यांनीं श्रीसाईभक्तमंडळाचा रस्ता पकडला. तेथें बाबांचे फोटोस नमस्कार केला व ते बाबांचें भजन म्हणूं लागले. त्याच रात्रीं झोंपण्यापूर्वी पहिल्यांदाच त्यांनीं बाबांची उदी पाण्यांतून प्राशन केली. नंतर झोपेंतच श्रीबाबा आपल्या कानांत कांहींतरी सांगत आहेत असा त्यांना भास झाला. बाबा त्यांना म्हणत होते, 'तुझें दुःख आतां नाहींसें झालें. लगेच ते उठले. तों पहांट झाली होती. नंतर ते लघ्वीस गेले. तोंच लघ्वीवाटे मुतखडा Stone कांहींही त्रास न होतां आपोआप बाहेर पडला. आतां त्यांची लघ्वीची कांहींही तक्रार नाहीं.

श्रीबाबांचें कृपाछत्र असल्यावर संकटें ताबडतोब दूर पळतात हेंच खरें.

× × ×

## श्रद्धेचें फळ मिळालें

श्री. डाह्याभाई दामोदर दास मेहता ह्या नांवाचे एक गृहस्थ गुजराथी गृहस्थ 'Paint and Hardware Merchant' म्हणून मुंबईत धंदा करतात. (धंद्याचा पत्ता २३ बी.सी.पी. टँक रोड, मुंबई व राहण्याचा पत्ता–चंदावाडी,माधवबाग, सी.पी.टँक, मुंबई.) १९४५ पूर्वी त्यांना श्रीसाईबाबांची विशेष माहिती नव्हती. त्याखालीं त्यांना आपला धंदा वाढवावयाचा होता. परदेशाशीं व्यापार करण्याकरतां ज्या 'इंपोर्ट लायसेन्स'ची (Import Licence) जरुरी लागते ती मिळविण्याची ते खटपट करीत होते. पण त्यांत यश येत नव्हतें. अशा स्थितींत गुजराथींत लिहिलेले श्रीसाईबाबांचें चरित्र त्यांचे वाचण्यांत आलें. त्यानंतर श्रीबाबांवर त्यांची श्रद्धा बसून ते बाबांच्या फोटोची पूजा, भजन वगैरे करू लागले. सुमारें ३ महिन्यांतच त्यांच्या श्रद्धेचें फळ त्यांना मिळालें. कारण अनेक खटपटी करून जे इंपोर्ट लायसेन्स त्यांना इतके दिवस मिळत नव्हतें तेंच पुन्हा प्रयत्न करतांच विनासायास लवकरच मिळालें, हें लायसन्स मिळतांच त्यांचा परदेशाशीं जोरात व्यापार सुरू झाला व अवघ्या १।१॥ वर्षांत त्यांना सुमारें १॥ लाख रुपये फायदा झाला. त्यानंतर ते १९४६ सालीं प्रथमच शिर्डीस बाबांचे दर्शन घेण्यास आले.

× × ×

## मी रक्षणासाठीं उभा आहें

वरील गृहस्थांचा दुसरा अनुभव जरासा विलक्षणच पण मोठा गमतीचा आहे.

बाबांना देव, देवस्की, गंडे, दोरे वगैरे गोष्टी आवडत नसत. देवावर पूर्ण श्रद्धा असली म्हणजे ह्या गोष्टींची जरूही पडत नाहीं. देव भावाचा भुकेला आहे व वरील गृहस्थांना बाबांवर श्रद्धा ठेवल्यामुळें काय फायदा झाला हें वर दिलेंच आहे. परंतु हे

गृहस्थ ( श्री. डाह्याभाई दारुमेहता ) गंडया दोऱ्याच्या भानगडींत कसे पडले व त्यामुळें काय झालें हें त्यांनींच आपल्या खालील अनुभवांत सांगितलें आहे—

'१९४६।४७ सालांतील गोष्ट. मी टायफॉईडनें आजारी पडलों. आमच्या चाळींत ( चंदावाडी, माधवबाग, सी. पी. टँक, मुंबई ) एका सुताराचें भूत वावरत आहे अशी बोलवा होती. ह्या भुतानें आमच्या चाळींतल्या पुष्कळ रहिवाश्यांना सतावीलें व शेवटीं तर माझ्या नोकरासही फार त्रास दिला. तेव्हां हें भूत आपणांस केव्हांतरी छळणार अशी मला उगाचच भीति वाटूं लागली. बाबांवर माझी पूर्ण भक्ति व श्रद्धा होतीच—पण कळत न कळत कां होईना माझेकडून त्या श्रद्धेला थोडेसें गालबोट लागलेंच. लोकांचे व नातेवाईकांचे सांगण्यावरून भूतबाधा होऊं नये म्हणून एक मंतरलेला ताईत मी गळ्यांत बांधला. वास्तविक बाबांवर माझी एवढी श्रद्धा असतांना मी असली गोष्ट करावयास नको होती पण ती केली ह्याचा राग बाबांना अर्थातच आला असला पाहिजे व म्हणून त्यांनीं मला शिक्षा करून एक चांगला धडा शिकविण्याचा बेत केला असला पाहिजे.

कारण कीं मी तो मंतरलेला ताईत गळ्यांत घालतांच लगेच टॉयफॉईडनें आजारी पडलों. घरांतील इतर सर्वच माणसें ह्याच तापानें आजारी पडलीं. डॉक्टर उपचार चालू होतेच. अशा स्थितींत एके दिवशीं रात्रीं बाराचे सुमारास माझ्या छातीवर त्या सुताराचें भूत बसलेलें दिसलें. तेव्हां मी लगेच 'बाबा' 'बाबा' अशी हांक मारली. तोंच माझ्या खोलींत असलेल्या फोटोंतील बाबा बोलत आहेत असें मला वाटलें. बाबा म्हणत होते, 'अरे ! भितोस काय ? मी सकाळपासून काठी घेऊन तुझ्या रक्षणाकरतां तुझ्यामागेंच उभा आहे. घाबरूं नकोस. तूं तो मंतरलेला ताईत तोडून मोडून फेकून दे.' त्याबरोबर तशा भेदरलेल्या अवस्थेंतच मी तो ताईत तोडून फेंकून दिला. भुतानें खूप अडथळा करण्याचा प्रयत्न केला पण श्रीसाईबाबांनीं त्यावेळेस माझे अंगांत कसें काय विलक्षण बळ निर्माण केलें असेल तें त्यांचें तेंच जाणोत, पण एका झटक्यासरशीं डाव्या हातानें मी भुतास बाजूस केलें व उजव्या हातानें तो ताईत तोडून फेकून दिला. ताईत तोडलेला पाहतांच भूत पळून गेलें.

जाग आल्यावर पाहतों तो ताईत गळ्यांत नव्हता. तो लांब एका कोपऱ्यांत तुटलेल्या स्थितींत पडलेला आढळला.

'बोध झाला परंतु शिक्षा राहिली. वरील प्रसंगानंतर माझी प्रकृति हळुहळु सुधारत चालली. पण एक दिवस कुपथ्य केल्याचें निमित्त झालें आणि ताप पुन्हां उलटला. उलटलेला टायफॉईड मोठा खराब असतो व रोगी दगावण्याचा बराच संभव असतो. माझी प्रकृति एकदम झपाट्यानें ढांसळत चालली. डॉक्टरचें औषध चालू होतें व त्यानें धीर दिला होता परंतु प्रकृतींत कांहीं लवकर उतार पडेना. तेव्हां मी अत्यंत घाबरलों व बाबांना नवस केला कीं, ह्या दुखण्यांतून जर लवकर उठविलें तर शिर्डीस जाऊन आपल्या

पायांचें दर्शन लगेच घेईन व दक्षणा म्हणून संस्थानास १०१ रुपये देईन. दुसरेच दिवसापासून प्रकृतींत आराम पडत चालला व सुमारें एक महिन्यांत साफ बरा झालों. ह्यानंतर शिर्डीस जाऊन केलेला नवस फेडला.

× × ×

## फोटो एकाएकीं नाहींसा झाला

श्री. लिंगोजीराव हिरवट्टेकर ह्या नांवाचे एक साईभक्त सैन्यामध्यें मेजर म्हणुन होते. त्यानीं आपला अनुभव पुढीलप्रमाणें सांगितला आहे.

'मी श्रीसाईबाबांचा भक्त १९४६ सालापासून आहे. त्यावेळेस मी श्रीबाबांचें दर्शन घेण्यास शिर्डीस प्रथमच आलों. परत जातांना श्री बाबांचा एक फोटो बरोबर घेऊन गेलों. तो फोटो मी एका सुंदर फ्रेममध्यें बसवून घेतला व त्याची रोज पूजा अर्चा करूं लागलों. फोटोची पूजा बहुतेक माझी पत्नीच करीत असे. कारण मला नोकरीमुळें पूजा वगैरे करण्यास जमत नसे.

'साधारण सप्टेंबर १९४९ सालची गोष्ट. त्यावेळेस माझी बदली कलकत्त्यास झाली होती. कार्टरमध्यें रहात असें. त्यांत आठ खोल्या होत्या. त्यापैकीं एका खोलींत श्रीसाईबाबांचा फोटो ठेवला होता. ती खोली देवघर म्हणूनच समजली जात असून अत्यंत पवित्र स्थितींत ठेवली होती. फोटोची पूजाअर्चा वगैरे नित्य त्रिधी माझी पत्नीच करीत असे. एके दिवशीं रात्रीं नित्यनियमाप्रमाणें बाबांच्या फोटोची पूजा केल्यावर दुसरे दिवशीं सकाळीं बाबांचें दर्शन घेण्यास माझी पत्नी जातांच तिला आश्चर्याचा मोठा धक्का बसला कारण–कारण फोटोफ्रेममधून बाबाच नाहींसे झालेले होते फोटोफ्रेम जशीच्या तशीच घट्ट होती पण आंत श्रीबाबांचा फोटो नव्हता! ज्या कागदावर तो फोटो छापला होता तो कागद मात्र पांढरा होऊन फ्रेममध्येंच राहिला.

'ह्या चमत्काराचा उलगडा अजून आम्हांस झाला नाहीं. वरील घटनेनंतर अजूनपर्यंत कोणताही चांगला अथवा वाईट प्रसंग आमचेवर आला नाहीं. माझ्या पत्नीची मात्र अशी पक्की खात्री आहे कीं, ज्याप्रमाणें बाबा त्या फोटोंतून एकाएकी नाहींसें झाले, त्याप्रमाणेंच अचानक कांहींतरी चमत्कार होऊन परत ते या फोटोंत येऊन बसतील. म्हणून त्या फ्रेममध्यें जरी आतां बाबांचा फोटो नाहीं तरी फ्रेमचीं बाबा आंतमध्येंच आहेत असें समजून आम्ही नित्य पूजाअर्चा करीत आहोंत.'

---



# भक्तीचा त्रिकोण

लेखक : द. शं. टिपणीस

ब्राह्मपदाप्रत पोंहोंचण्याची आकांक्षा प्रत्येक मनुष्यानें बाळगावी. म्हणूनच तर आपणास मानव जन्म प्राप्त झाला तेथपर्यंत पोहोंचण्याचे जे मार्ग आहेत, त्यांत भक्तिमार्ग हाच सर्व श्रेष्ठ, कमीत कमी कष्टाचा व संसारी माणसालाही शक्य, सुलभ व स्वाभाविक असा आहे. भक्तीचा त्रिकोण कसा साधावा, भक्ति कशी असावी ती कशी साधावी व ती करतां करतां तिचा उच्चांक कसा गाठावा याचें या लेखांत करण्यांत आलेलें विवेचन भक्ताला मार्गदर्शक होऊन राहील अशी अपेक्षा आहे. —संपादक

'जगत् मिथ्याः ब्रह्म सत्यं' हें वेदांचें सार आहे. ब्रह्मानें जग निर्माण केलें. गोचर अगोचर सर्व चराचर ब्रह्मापासून झालें. ब्रह्म तेवढें सत्य. बाकी सर्व ब्रह्मपसारा मिथ्या खोटा आहे, त्याला अस्तित्व नाहीं. तो भास आहे. व तो ब्रह्माच्या मायेनें निर्माण केला आहे. अशा प्रकारचे विचार वेदांत आहेत. ते सत्य आहेत. तसा अनुभव येतो अशी ग्वाही ऋषीमुनींनीं, साधुसंतांनीं व श्रेष्ठ विभूतींनीं वेळोवेळीं दिली आहे. यामुळें सामान्य माणूस त्यावर निष्ठापूर्वक विश्वास ठेवतो. परंतु आपलें व्यवहार मात्र त्याकडे दुर्लक्ष करून करीत असतो. असें कां ? कारण मूळ तत्वामुळें निर्माण होणाऱ्या प्रश्नाकडे त्याचें लक्ष जात नाहीं. व त्याची संयुक्तिक उत्तरें तो मिळवूं इच्छित नाहीं. ब्रह्मानें हें जग निर्माण केलें. मग तें मासमान कां केलें ? चराचरावर मायेचें आवरण कां घातलें ? इतर प्राण्यापेक्षां अनेक दृष्टीनें निराळा असा मानवप्राणी कां निर्माण केला ? सर्व मिथ्या आहे तर मानवाच्या ठिकाणीं नाना शक्ति कां निर्माण केल्या ? त्या सर्व मिथ्याच आहेत काय ? असल्या तर मग त्याचा उपयोग करून काय फायदा ? ज्ञानाची काय जरूरी ? सर्वच मिथ्या मग नीति तरी कशाला पाहिजे ? बोलून चालून दो दिवसांची दुनिया, नाशिवंत, मग नाना तऱ्हेचे व्यवहार करण्याची काय जरूरी ? वगैरे नाना प्रश्न उद्भवतात, याची उत्तरं सामान्य माणसास पाहिजे असतात, त्याला संयुक्तिक उत्तरें मिळालीं तर तो आपली जीवन नौका मूळ तत्वाशीं सुसंगत ठेवूं शकेल हें जाणून या सर्व प्रश्नांचा खोल विचार वेदांनीं केला आहे.

### जीवनाचा उद्देश

जगत् मिथ्या; ब्रह्म सत्यं हें ओळखणारा जाणणारा कोणी तरी पाहिजे. नसेल तर मग परमेश्वराचें महत्व, त्याचे कौशल्य समजणार कोण ? कलाकारानें सुंदर चित्र काढलें,

पण त्याचा सुंदरपणा जाणणारा, त्याचा आस्वाद घेणारा नसेल तर त्या कलाकाराचें कौशल्य उघड कसें होईल ? तद्वत् मायेचें पांघरूण काढून मिथ्यत्व ओळखून लपलेल्या ब्रह्माला हुडकून काढणारा नसेल तर ब्रह्माच्या सृष्टीरचनेंतील कौशल्याचें कौतुक कोण करणार ? तें करणारा कोणीतरी पाहिजे; म्हणून त्यानें मानवप्राणी निर्माण केला, एवढेंच नव्हे तर आपणास ओळखण्यास उपयोगी पडतील अशी जरूर ती सर्व साधनें मानवास दिलीं. लहान मुलांच्या लपंडावांत एखादें मूल मुद्दाम लपून बसते व इतर मुलें त्याला हुडकून काढण्याची कोशिश करतात. जर कोणी लपून बसला नाहीं तर खेळ होणार नाहीं व शोधून काढण्यामुळें मिळणारा आनंदहि मिळणार नाहीं व मग खेळांत मन रमणार नाहीं. खेळांत लपणारा व त्याला हुडकणारे मुळांत सर्व एकच म्हणजे मुलेंच असतात. तसेंच ब्रह्माच्या खेळांत लपणारा व त्याला हुडकणारे वस्तुतः मुळांत एकच आहेत. हा जगत् पसारा म्हणजे ब्रह्मानें सुरूं केलेला लपंडाव आहे. मायेच्या आवरणाखालीं ब्रह्म लपून बसलें आहे. त्याला हुडकून काढण्याचें काम मानवाचें आहे. ब्रह्माच्या खेळांतील मानव हा त्याचा भिडू आहे. मायेच्या आवरणाखालीं जें ब्रह्म, जें चैतन्य लपून बसलें आहे त्याला मानवानें हुडकुन काढावें, त्याला शिवावें, त्याच्याशीं समरस व्हावें हा उद्देश सृष्टी रचनेच्या बुडाशीं आहे, सर्व मानवी जीवन लपंडावाचेंच आहे. व्यवहारांत आपण एकमेकाशीं लपंडावच खेळत असतों. ब्रह्माच्या हा खेळ खेळतां खेळतां मधून मधून एकादा भिडू असा निघतो कीं तो ब्रह्माला हुडकून काढण्याच्या प्रयत्नास लागतो व त्यास शोधून काढतो, त्याशीं समरस होतो व आपल्या जीवाचें सार्थक करतो. ब्रह्म शब्दातीत असल्यामुळें त्यानें जें जाणलें तें इतरांस शब्दानें सांगतां येत नाहीं. ब्रह्म प्रत्यक्षच पहावें लागते जाणावें लागतें, अनुभवावे लागते अशा श्रेष्ठ विभूतींनीं जे प्रयत्न केले, जे मार्ग अनुसरले त्यांची नोंद इतरांसाठीं त्यांनीं करून ठेवली आहे. अशा श्रेष्ठ विभूतींच्या अनुभवाप्रमाणे ब्रह्माला हुडकून काढण्याचे मुख्यतः तीन मार्ग आहेत. ज्ञान–मार्ग, भक्तिमार्ग व योगमार्ग. **पैकीं भक्तिमार्ग हा ब्रह्माप्रत जाणारा अध्यात्मांतील राजमार्ग आहे.**

**भक्ति–नैसर्गिक व प्रेममयः—**

राजमार्ग आपण कशास म्हणतों ? जो मार्ग रुंद, सरळ, जाण्यायेण्यास प्रशस्त व जेथें खांचखळगे वा धोके नाहींत तो राजमार्ग होय. भक्तिमार्ग असा आहे. त्यांत खांचखळगे नाहींत. धोके नाहींत. चुकण्याची धास्ती नाहीं. भक्तिमार्ग सोपा व नैसर्गिक आहे. सोपा म्हणजे तुलनात्मक दृष्टीनें. त्यांत कष्ट नाहींत, त्रास नाहीं, संकटें नाहींत. आयुष्यांतील सुखें भोगतां भोगतां खुशाल त्या मार्गानें जावें असा अर्थ नाहीं. इतर मार्गांच्या मानानें सोपा, कमी कष्टांचा, कमी त्रासाचा एवढाच त्याचा अर्थ. आत्मज्ञान होतें तें सहजगत्या, चैन भोगून नव्हे. त्यासाठीं कष्ट, सतत प्रयत्न दृढनिष्ठा पाहिजेतच. नैसर्गिक आहे. कारण तिचा उगम प्रेमांत आहे. भक्ति म्हणजे प्रेम, प्रेम नैसर्गिक आहे. प्रेमाचा अंश नाहीं. असा मानवांत वा मानवेतरांत कोणी तरी असूं शकेल काय ? प्रेमाविणें

जीवन नाहीं, ईश्वर, प्रेममय आहे. सर्व प्राणिमात्रांत, त्यांच्या यच्चावत् हालचालींत प्रेम हें असतेंच. फक्त कोणत्या प्रकारचें एवढाच प्रश्न. प्रेमाचें अधिष्ठान ऐहिक सुख वा पारमार्थिक सुख यावर त्याचें मूल्य व कार्य अवलंबून आहे. भक्ताचें प्रेम त्यानें निवडलेल्या देवावर, ध्येयावर असतें. त्याच्या प्रेमाचा सर्व ओघ देवाकडे असतो. देवाची हरएक गोष्ट त्याला आनंद देणारी असते.

प्रत्येकाच्या ठिकाणीं उपजतच असलेलें जें प्रेम त्याचा उपयोग करून ईश्वरप्राप्ति आत्मज्ञान करून देणारा जो प्रेममय मार्ग तो भक्तिमार्ग; त्यामुळें इतर कोणत्याहि मार्गापेक्षां हा अधिक लोकमान्य झाला आहे. भक्तीमुळें मिळणारा आनंद इतका अवीट असतो कीं, त्याचा पुन्हां पुन्हां स्वाद घेण्यासाठीं भक्त धडपडत असतो. आपल्या देवाखेरीज इतर कशांतही त्याला गोडी वाटत नाहीं. भक्ति ही सिताफळाप्रमाणें गोड व सहज परिपक्व होणारी म्हणजे साध्य होणारी आहे. आपलें प्रेम कशा प्रकारचें व कोणत्या दिशेकडे जाणारें असावें, आपल्या वासना, भावना यांचें नियमन व दमन कसें करावें व त्यायोगें उच्च ध्येय कसें साधावें या गोष्टी भक्तियोगानें सहजासहजीं कळूं लागतात. नव्हे या सर्व क्रिया आपोआप नैसर्गिकरीत्या घडून येत असतात. आपले विचार–विकार यांवर ताबा मिळविण्यासाठीं भक्ताला मुद्दाम परिश्रम आटाआट वा एकादी निराळी साधना करावी लागत नाहीं. भक्तीचें वर्तुळ जसजसें वाढत जातें, भक्तीची तीव्रता, भक्तिप्रेमाचा आवेग जसजसा वाढत जातो, तसतसा वासनाक्षय आपोआप होतो. **वसुदेव श्रीकृष्णास घेऊन जात असतां दरवाजांची कडीकुलपें आपोआप गळून पडलीं व त्याचा मार्ग मोकळा झाला. तसाच प्रकार वासनांचा होतो.** भक्ताच्या प्रेमाचा ओघ एकाग्रतेनें वाहूं लागला कीं त्याच्या आड येणाऱ्या आंतरिक वासना, भावना या दूर लोटल्या जातात. व्यवहारांतील नेहमींच्या अनुभवावरून ही गोष्ट सहज समजूं शकेल. रिकामपणीं भूक फार लागते. माणसाला खाखा सुटते हा अनुभव नित्याचा आहे. परंतु आपण एकाद्या कामांत अत्यंत गर्क असलों तर मग मात्र आपल्याला तहान भुकेचें भानही सहज नाहीं. एवढेंच नव्हे तर त्या वेळेला कोणी आपल्या पुढें खाद्य ठेवलें तरी आपलें काम संपेपर्यंत आपण तिकडे ढुंकूनही पहात नाहीं. तसाच कांहींसा प्रकार भक्तिमध्यें वासनांच्या बाबतींत घडत असतो. भक्तिप्रेमाची गोडी इतकी मधुर आहे कीं, तो चाखण्यांत भक्त रमून जातो, इतर विषयांत त्याला गोडी वाटत नाहीं. अशा प्रकारें नैसर्गिकरीत्या आपल्या वासनांवर नुसता ताबाच नव्हे, तर त्यांचा संपूर्ण नायनाट करण्याचें सामर्थ्य भक्तियोगांत आहे, म्हणून सर्वसाधारण जनतेला हाच मार्ग सोपा व श्रेयस्कर आहे.

## भक्तीचा त्रिकोण :

भक्ति म्हणजे प्रेम. या प्रेमाच्या एकापेक्षां एक चढत्या पायऱ्या–भाव (Degree) आहेत व तदनुसार भक्तीचे अनेक प्रकार होतात. सर्वांत उच्च प्रकार 'मधुर' भक्ति हा होय. याची अलीकडील उदाहरणें म्हणजे श्री. रामकृष्ण परमहंस व श्री चैतन्य देव हीं होत. पौराणिक उदाहरण म्हणजे राधेची श्रीकृष्णावर असलेली भक्ति हें होय.

उच्च शुद्ध प्रेम म्हणजे काय हें ध्यानीं यावें एवढ्यासाठींच वरील उदाहरणें दिलीं आहेत. सर्वसाधारण भक्ताला, भक्तींत नवीनच पदार्पण करणाऱ्यांना थोडेंफार मार्गदर्शन करतील असेंच विचार या लेखाद्वारें मांडण्याचा मानस असल्यामुळें भक्तीच्या प्रकारच्या अधिक विवेचनांत न शिरणें बरें; परंतु भक्तीची सर्वसाधारण सुरवात कशी होते, तिचा शेवटचा बिंदू कोणता या गोष्टी भक्तास अवगत असणें जरूर असल्यामुळें त्यासंबंधीं थोडासा ऊहापोह करणें रास्त होईल.

सर्वसाधारणपणें माणूस देवाकडे वळतो तो देवाणघेवाण या वृत्तीनें अडीअडचणी, संकटें, आजारीपण इत्यादींच्या कचाट्यांत माणूस सांपडला व अनेक उपाय करून थकला कीं मग कोणाच्या तरी सांगण्यावरून देवाकडे वळतो, त्यास नवस करतो व तो पावला कीं त्याला त्या देवाबद्दल आपलेपणा वाटतो. परंतु क्षणैक. काम झालें कीं तो देवाला विसरून जातो. पुन्हां कोठें अडला कीं पूर्वीच्याच वृत्तीनें देवाशीं व्यवहार करतो. आपण देवास एवढें दिलें त्याबद्दल देवानें आपणांस अमुक द्यावें अशी अपेक्षा असते. दुकानदाराला पांच रुपये दिले कीं त्यानें आपणांस पांच रुपयांचा माल द्यावा असल्याच प्रकारची ही अपेक्षा आहे. ही व्यापारीवृत्ति झाली, वणिज्यवृत्ति झाली. वणिज्यभक्ति ही अत्यंत निकृष्ट भक्ति होय. या वृत्तींतील देणें कायम राहून घेणें जेव्हां अजिबात नाहींसें होईल, एवढेंच नव्हे, तर देण्याचा हिशोबही ठेवला जाणार नाहीं तेव्हां खऱ्या भक्तीस प्रारंभ झाला असें समजावें. वणिज्यवृत्ति ऐवजीं अहंकार विरहित व अपेक्षारहित दातेपणाची भावना निर्माण झाली कीं, भक्तिप्रेमाचा झरा वाहण्यास सुरवात होते. कारण भक्ति हें खरें शुद्ध प्रेम आहे व तें स्वाभाविक आहे. त्याच्या अटीतटी नसतात. प्रेमासाठीं प्रेम करणें या एका गोष्टी खेरीज इतर कोणत्याहि इच्छा वा अपेक्षा खऱ्या प्रेमांत नसतात.

कित्येकवेळां भीतीमुळें आपण भक्ति करीत असतों, देवाचें केलें नाहीं तर देव कोपेल, शाप देईल, आपलें वाईट करील अशी भीति वाटून आपण मनांत नसलें तरी केवळ देवास खूष करण्यासाठीं त्याची भक्ति म्हणजे भक्तीचा आभास उत्पन्न करतों. स्वार्थ आपणांस इतरांपासून निराळा करतो. निराळेपणा परकेपणा आला कीं भीति उत्पन्न होते. आपलेपणांत भीति असत नाहीं. आई कितीही रागावली म्हणून कां लहान बालकाला तिची भीति वाटेल ? नाहीं. कारण तेथें निराळेपण ( Seperation ) नाहीं. खऱ्या भक्तींत, खऱ्या प्रेमांत भीतीचा लवलेशही नसतो. देवासाठीं भक्त जें कांहीं करतो तें त्याला खूष करण्यासाठीं नव्हे, तर भक्ताचें आपल्या उपास्याठायीं असलेलें प्रेम त्याला तें करावयास लावतें. आपली भक्ति निर्भय झाली कीं आपण भक्तीच्या त्रिकोणांतील दुसरा बिंदु गांठला म्हणून समजावें. पण केवळ निर्भय भक्तीनें आपलें सर्व काम पूर्ण होतें असें मात्र नव्हे. भक्तीचा त्रिकोण पूर्ण होण्यास आणखी एका बिंदूची जरूरी आहे, आपल्या देवाला पूर्ण शरण जाणें, आपलें सर्वस्व त्याला अर्पण करणें जरूर असतें. अनन्यशरणागता पाहिजे. अशाप्रकारें

दातेपणा, निर्भयपणा व अनन्यशरणागता या तीन महत्त्वाच्या गोष्टींनीं भक्तीचा त्रिकोण पूर्ण होतो. त्या भक्ताने साधल्या की त्याची भक्ति पूर्ण झाली असें होईल.

**भक्तीच्या मार्गांतील बंधनें:—**

भक्तिमार्गांत भक्ताला कांहीं बंधनें नाहींत असा एक चुकीचा समज आहे. भक्ताला कोणतीही भावना चांगली या वाईट त्याज्य नाहीं. दोन्ही त्याला समान आहेत. या म्हणण्यांतील गूढार्थ न समजल्यामुळें कांहीं भक्तिपंथांत स्वेच्छाचाराला जी मुभा देण्यांत आली आहे ती केव्हांही गैर आहे. श्रीरामकृष्ण कित्येक वेळां स्त्री वेष धारण करून भावना वेषांत नाचत असत; म्हणून आपणही तसेंच करूं लागलों तर ते हास्यास्पद ठरेल, कित्येक सिद्ध मुक्त पुरुष मन मानेल तसे वागतात, खरकटीं उष्टींही खातात म्हणून आपणही तसेंच करूं लागलों तर तो एक अव्वल दर्जाचा मूर्खपणा ठरेल. या सिद्धपुरुषांनीं जें साध्य केलें, त्यांच्या ठिकाणीं जें अभेदत्व होतें, जी चराचराशीं एकात्मता होती तें सर्व प्रथम आपण मिळवावें व मग विधिनिषेधरहित जीवनाच्या गोष्टी बोलाव्यात. अनुकरण करण्याच्या उत्साहांत आपल्या योग्यतेशीं ज्यांचा मेळ बसणार नाहीं अशा गोष्टीचें अनुकरण करून आपण आपलें हसें करून घेऊं व भक्तिबद्दल लोकांत गैरसमज पसरवूं. भक्तिमार्ग हा प्रेममार्ग असल्यामुळें सदाचाराचीं पवित्रपणाचीं, सर्व बंधनें भक्तानें कसोशीनें पाळलीं पाहिजेत. भक्तीच्या सुरवातीलाच आपण बंधनाच्या पलिकडे गेलों असें भक्तानें कधींही समजूं नये.

**भक्तीचें मुख्य साधनः—**

आपल्या भक्तिप्रेमाला व्यवस्थित वळण लावण्यास उपयोगी पडणारें भक्ति मार्गांतील प्रमुख साधन नामस्मरण हें होय. विजेचा झोत विशिष्ट कांचेतून गेल्यास पडद्यावर स्वच्छ स्पष्ट असें चित्रण होतें. हें सिनेमा शौकीन जाणतातच. कापुस कितीही कडक उन्हांत ठेवला तरी जळणार नाहीं; परंतु तींच किरणें विशिष्ट भिंगामधून कापसावर पाडलीं तर कापूस जळतो, हा शास्त्रीय अनुभव आहे. हें होतें याचें कारण शक्ति केंद्रित झाली कीं तिचें सामर्थ्य अनंतपटीनें वाढतें. आपल्या देवावरील प्रेम त्याच्या ठिकाणीं केंद्रित केल्यानें प्रेमाचें भक्तीचें सामर्थ्य वाढतें. हें केंद्रीकरण म्हणजे एकाग्रता जितकें सूक्ष्म व तीव्र असेल तितकें अधिक सामर्थ्य देणारें असतें.

नामस्मरण या केंद्रिकरणानें एकाग्रतेचें साधन आहे. नामस्मरण म्हणजे नुसतें नाम पुटपुटणें नव्हे, तोंडांत नाम पण लक्ष मात्र बाह्य गोष्टींकडे, अशा नामस्मरणाचा काडीइतकाहि उपयोग नाहीं. नामस्मरणांत आपलें लक्ष आपल्या दैवताकडे असलें पाहिजे; नामस्मरणाच्या आधारें आपल्या सर्व अंतर्गतशक्ति आपल्या उपास्य दैवतावर केंद्रित करण्याची आपण संवय केली पाहिजे. नाम जपतांना आपल्या दैवताची केवळ मूर्तीच नव्हे, तर तिच्याठायीं असलेले सद्गुणही आपल्या दृष्टीसमोर सारखे राहिले पाहिजेत. सतत चिंतनानें आपण ज्यांचें चिंतन करतों त्याच्याशीं तद्रूप होऊन जातों, त्याचे सद्गुण आपणांस चिकटतात. भक्तिमार्गी

हा आरंभीं द्वैताचा मार्ग असला तरी तो अंतीं अद्वैतांत संपतो. भक्तिप्रेम नामस्मरणानें अगर अन्य साधनानें जसजसें तीव्र व शुद्ध होत जातें, तसतसें देव व भक्त यांतील अंतर कमी कमी होत जातें व शेवटीं भक्ताला आपण आपल्या उपास्य दैवताहून निराळे आहोंत असें वाटत नाहीं, तो अव्यक्तांत पूर्ण समरस होऊन जातो. ही गोष्ट श्रीरामकृष्ण भक्तीच्या आवेगांत देवीची म्हणून कित्येक वेळां स्वतःचीच पूजा करीत. या घटनेवरून सहज ध्यानीं येईल. भक्ति चित्तशुद्धिकारक आहे. आपल्या वासना, भावना वगैरेंना इंद्रिय-बाह्य गोष्टीकडे धांव घेण्याची संवय असते, ती रोखून अपल्या सर्व वृत्ति अंतर्मुख कर-ण्याचा प्रयत्न भक्तानें केला पाहिजे. आपल्या वासना, भावना सर्व आपल्या उपास्य दैवतावर केंद्रित कराव्या.

**श्री साईबाबांनीं स्पष्ट सांगितलें आहे कीं—कोपावें तरी मजवरी कोपावें। कामावें तरी मजवरी कामावें॥** थोडक्यांत म्हणजे एकाद्या व्यक्तीस एकाद्या गोष्टीचा ध्यास लागला म्हणजे त्या गोष्टीखेरीज त्याला दुसरें कांहीं दिसत नाहीं, सुचत नाहीं, ध्यानीं मनीं स्वप्नीं तीच गोष्ट असें होतें; तसेंच आपणांस आपल्या देवाचा ध्यास लागला तर आपली भक्ति सफल व यशस्वी होईल.

**भक्ताचा आहार**

भक्तानें आपला आहार शुद्ध, सात्त्विक ठेवणें जरूर आहे. आहार म्हणजे जें आपण खातों पितों तें एवढेंच समजूं नये. आहार म्हणजे आंत घेणें. बाह्य जगांतील जें जें आपण इंद्रियद्वारा ग्रहण करतों तो आहार. अन्न पेय तर शुद्ध असावींच, परंतु बाह्य इंद्रियद्वारां ज्ञान ग्रहण करतांना त्यांत लोभ, मत्सर, द्वेष वगैरे मिसळले जाऊं नयेत, याची दक्षता भक्तानें घेतली पाहिजे. डोळ्यांनीं सुंदरपणा पहावा, नाकानें सुंदर वास घ्यावेत, कानांनीं शुद्ध सात्त्विक विषय एकावेत याप्रमाणें सर्व बाह्य इंद्रियांकडून शुद्ध आहार घेतला जाईल, याची कोशीस भक्तानें कशी करावी, हें पुढील ओव्यांत स्पष्ट केलें आहे.

**चित्तें करा हरि गुरु चिंतन। श्रवणें करा चरित्र श्रवण।**
**मनें करा ध्यानानुसंधन। नाम स्मरण जिव्हेनें॥**
**चरणीं हरि गुरुग्रामा गमन। घ्राणीं तन्निर्माल्य घ्राणन।**
**हस्तीं वंदा तयाचे चरण। डोळां घ्या दर्शन तयाचें॥**
**ऐशा या सकल इंद्रियवृत्ति। तया कारणें लावितां प्रीति।**
**धन्य त्या भक्ताची स्थिती। भगवद्भक्ति काय दुजी॥**

अशा प्रकारें भक्ति करीत राहिल्यानें आस्ते आस्ते आपण आपल्या देवाशीं एकरूप होऊन जाऊं. जें कांहीं करावयाचें ते आपल्या देवासाठीं ‘ अशी वृत्ति होईल. त्याच्या खेरीज कोणीही नाहीं. स्वतांही नाहीं. सर्वच देवमय. जें जें कांहीं आपलें आहे तें आपलें म्हणून न ठेवतां देवाच्या चरणीं समर्पून आपल्या उपास्य दैवतांत, अव्यक्तांत मिसळून जाणें हा भक्तीचा सर्वांत उच्चांक आहे.

---

# क्षमा ज्याच्या अंगीं —

**आमच्यापैकीं प्रत्येकानें जे सद्गुण अंगीं बाणवून आचरणांत आणणें जरूर आहे त्यापैकीं क्षमा हा एक बहुमोल व मनुष्य मात्राला शोभा देणारा, गुण आहे. कोणत्याही बहुमोलाच्या अलंकारानें शोभा येणार नाहीं इतकी या सद्गुणानें येते. परंतु आपण त्याच्याकडे फारसें लक्ष पुरवीत नाहीं.**

मनुष्याच्या हातून हरघडी चुका घडत असतात. चुका घडल्या म्हणजे कोणाचा तरी रोष पत्करावा लागतो किंवा बोलून घ्यावें लागतें. क्षमाशील व्हा, असा उपदेश आजवर अनेक साधुसंतांनीं केला आहे. वाडवडीलहि पोक्तपणें हा सल्ला देत आले आहेत; परंतु आमचें वागणे पूर्ववत् चालूच आहे.

## क्षमाशीलतेचें महत्त्व

हा गुण म्हणजे ती एक ईश्वरी देणगीच आहे म्हणा ना. क्षमाशील व्हा असें म्हणणें सोपें आहे हो! परंतु आम्हांला या जगांत वावरायचें असतें; संसारांतील रोजचे व्यवहार संभाळायचे असतात. येथें अपराधी, दोषी व पापी माणसाला क्षमा करून कसें बरें चालेल? शिक्षा ही केलीच पाहिजे. त्याशिवाय दहशत बसावी कशी?

पापी किंवा अपराधी मनुष्याला शिक्षा दिली जाते. कायदा त्याला शासन करायला तयारच असतो.

आपण एक गोष्ट नेहमीं लक्षांत बाळगली पाहिजे कीं, मनुष्य स्वभावतः दुष्ट किंवा पापी नसतो. परिस्थितीनुरूप त्याच्याकडून पापाचरण घडत असतें. कित्येकवेळां अज्ञान हेंही त्याचें कारण असतें. प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणांत ईश्वरी अंश हा असतोच असतो. तो ईश्वरांश जागविण्यांत आला पाहिजे. शोधून काढण्यांत आला पाहिजे. तो शोधून काढून एखाद्या माणसावर करण्यांत आलेली दया व्यर्थ जात नाहीं.

## कायदा आणि शासन

अलिकडे दुष्ट, पापी अपराधी माणसांस शासन करूनही त्यांना सुधारण्याचे प्रयत्न देशोदेशीं चालू आहेत.

शिक्षा पावलेल्या माणसास बंधुभावानें जवळ घेऊन त्याला जर आपण प्रेमानें सांगितलें कीं, हे बंधो! तुझ्या हातून नकळत गुन्हा किंवा पाप घडलें आहे. कायद्याप्रमाणें तुला शिक्षा झालेली असली तरी तूं तुझ्याठायीं बीजरूपानें असलेल्या परमेश्वराकडे जरा वळून तर पहा. त्याची आठवण कर, त्याला आळव आणि दुर्गुणांवर विजय मिळव. मनांत दुष्ट विचार येतात; येईनात का. आपण त्यांच्याशीं अविरत झगडत राहून त्याच्यावर मात केली पाहिजे. तसें करण्यांतच पुरुषार्थ आहे. तुला झालेली शिक्षा ही तुला अद्दल घडावी, तूं शहाणा व्हावें, यासाठीं ही शिक्षा आहे. तूं सुधारलास तर तिची कांहींच जरूरी नाहीं. तेव्हां तूं शहाणा हो; दुष्ट प्रवृत्तींवर विजय मिळव आणि पुरुषार्थ गाजीव.

इतकें सांगितल्यानंतर त्या माणसाची कां बरें सुधारणा होणार नाहीं? तो माणूस आहे ना? त्याच्या ठायीं भगवंताचा अंश आहे ना?

**क्षमा कशी असावी?**

आपण ज्याला क्षमा करतों ती क्षमा अंतःकरणापासून असावी. आपण ज्याला क्षमा करतों त्याच्या ठायीं जें चांगलें व मंगल असेल तें आपण पाहिलें पाहिजे. आपण आपली कल्पना शक्ति जागृत केली पाहिजे. जे सर्वसाधारण दृष्टीला दिसत नाहीं तें कल्पना शक्तीच्या द्वारें आपण पाहूं लागलें पाहिजे.

पापी मनुष्यास आपण क्षमा केली तर तिचा योग्य तो परिणाम घडून येण्यासाठीं त्याच्या मनांत आशा, धैर्य वगैरे गुणांचें आपणांस बीजारोपण करतां आलें पाहिजे. नव आशेनें त्याचें सर्वांग फुलून गेलें पाहिजे. आपण कोणी तरी आहे, आपल्यांत कांहीं तरी आहे, ईश्वराचा आपल्यांत अंश आहे या गोष्टीची त्याला जाणीव झाली पाहिजे. तेव्हां माणसांत आत्मविश्वास जागृत करून त्याला सत्कार्याकडे वळविलें तर त्याच्या ठिकाणीं असलेले दुर्गुण नाहींसे होऊन त्यांची जागा सद्‌गुणांनीं व्यापल्याशिवाय रहाणार नाहीं.

**भगवंताचें नामस्मरण**

भगवंताचें प्रेमानें नामस्मरण हेंही यावर एक रामबाण औषध आहे. भगवंताच्या नावानें महापापीही तरले आहेत. या पुराणांतराच्या वार्ता नव्हत. या सत्य कथा आहेत. तुम्हीं रामनामाचा किंवा श्रीसाईनामाचा जप सुरू करा. आणि मग पहा कीं, तुमच्या मनांतील पापांचा सारा मळ धुवून साफ होईल. अंतःकरण निर्मळ व निष्पाप होईल.

**जेथें रामनामाचें गर्जन। फिरे तिथें विष्णुचें सुदर्शन।**
**करी कोटी विघ्नांचें निर्दाळण। दीन संरक्षण नाम हें॥**

बाबांच्या या अमृतवाणीवर तुम्हीं श्रद्धा ठेवा व आपल्या जन्माचें सार्थक करा.

---

**लहान मुलांच्या आंकडीवर**
**जुनें आणि प्रसिद्ध औषध**

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. **जयकर ब्रदर्स**, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

**कांचनलाला वाडीलाल कं.** — दवाबझार, मुंबई २.

[illegible] वाचनालय, [illegible]



# मोहाच्या जाळ्यांत अडकूं नका

लेखक : आप्पाराव

**सर्वसाधारण माणसाच्या जीवनांत वेळोवेळीं नाना प्रकारचे मोह किंवा प्रलोभनें निर्माण होत असतात. त्यांच्या जाळ्यांत माणूस सांपडला म्हणजे त्याला गति नाहीं. तो त्यांतच अडकून पडतो. आपणास सद्गति मिळावी व आपला उद्धार व्हावा असें वाटतें ना? मग त्यासाठीं काय कराल?**

मनुष्य नानाप्रकारच्या प्रलोभनांच्या जाळ्यांत सांपडून शेवटीं स्वतःची हानि करून घेत असतो. सर्व पापांचें मूळ किंवा आदिकारण म्हणजे लोभ हेंच होय. मनुष्य कोणत्या ना कोणत्या प्रलोभनानें आकर्षिला जात असतो. यासाठीं सावधगिरि बाळगणें जरूर असतें. या लोभामुळें मनुष्य स्थानभ्रष्ट होत असतो. मनुष्याच्या मार्गांत येणारीं कित्येक प्रलोभनें मोठीं मायावी व मति गुंग करून टाकणारीं असतात. त्यांच्यापुढें शहाणपण चालेनासें होतें. मनुष्य पंगू व दुबळा बनतो. तो त्यामुळेंच; परंतु पुष्कळशीं प्रलोभनें मृगजळाप्रमाणें असतात. तीं माणसाला आपल्याकडे खेचून त्याची फसवणूक करतात व त्याला खड्डयांत पाडतात.

मनुष्याला वाटत असतें कीं आपण धनवान् व्हावें. खूप संपत्ति आपल्याजवळ असावी. त्या हेतूनें तो नाना लबाडया करतो, काळाबाजार करतो, फसवाफसवी करतो, कुठून ना कुठून स्वतःची तुंबडी भरून घ्यावयाची. त्याच्या जोरावर सुख व ऐषआराम भोगावयाचा.

अमुक गृहस्थाची पत्नी सुंदर आहे. आपणास तशी किंवा त्याहीपेक्षां सुंदर पत्नी लाभावी अशी इच्छा मनांत प्रबळ होऊन त्यासाठीं माणूस धडपड करूं लागतो. हें एक प्रकारचें वेडच आहे.

कोणाचें घर किंवा बंगला सुंदर आहे, तसा आपणास मिळावा, घरांत भरपूर नोकर चाकर, फर्निचर, सुखोपभोगाच्या नाना वस्तूंनीं घर संपन्न असावें असें वाटूं लागतें. मग त्याच्या प्राप्तीसाठीं धडपड करावयाची. मनाला स्वस्थता म्हणून नाहीं.

अहो! काय सांगावें? प्रलोभनें किती प्रकारचीं म्हणून असतात! आणि मनुष्याला या नाहीं त्या प्रलोभनांनें आकर्षित केल्यामुळें त्याच्या प्राप्तीसाठीं त्याची अहर्निश धडपड चाललेली असते. कधीं म्हणून समाधान नाहीं.

ज्याचें चारित्र्य खंबीर नाहीं, ज्याचें जीवन नैतिक पायावर आधारलेलें नसतें, ते या नाहीं त्या प्रलोभनाच्या जाळ्यांत सांपडून ध्येयापासून च्युत होत असतात. बरें, ज्याचा आपणास मोह वाटतो ती गोष्ट आपल्या जवळ आली असतां आपलें समाधान होतें का? नाहीं. तें कधींही व्हायचें नसतें.

जी वस्तु आपल्याजवळ नाहीं, ती आपणांस मिळावी, ती आपल्याजवळ असावी असें वाटत असतें.

हे सारे मनाचे खेळ आहेत. मनासारखा आपला प्रबळ शत्रु दुसरा कोणीहि नसेल. मनावर दुष्टवासना व कुविचार यांचा पगडा फार जलद बसत असतो. मनावर ताबा न ठेवतां आल्यानें व मनाचा वारू मोकाट सोडल्यानें मनुष्य पदभ्रष्ट होत असतो. या मनाबरोबर युद्ध करणें महा कठीण आहे. त्यासाठीं खंबीरता, दृढता लागत असते. खंबीरपणें व दृढनिश्चयपूर्वक टक्कर देत राहिल्यानें मनाच्या कारवायांस ठोकरा बसत जातात व त्याचें बल आस्ते आस्ते कमी कमी होत जातें. तसें घडत गेलें तरच या जगांत माणसाचा निभाव लागणें शक्य आहे.

दृढ निश्चयपूर्वक मनाच्या हालचालींवर सतत पहारा ठेविला पाहिजे. प्रत्येक मुमुक्षूनें प्रथम आपल्या मनावर ताबा ठेवायला शिकलें पाहिजे. व अशा रीतीनें इच्छाशक्ति उत्तरोत्तर वाढवीत गेलें पाहिजे. तुम्हीं मनाला जो मार्ग दाखवाल, जिकडे त्याला झुकवाल, तिकडे तें वाटचाल करूं लागेल. मन कधीं स्वस्थ रहाणार नाहीं. त्याला उद्योग, चाळवाचाळव करायला हवी असते. ती चाळवाचाळव मग वाईट किंवा बरी असो. तुम्हीं त्याला चांगल्या गोष्टींकडे, सत्प्रवृत्तीकडे नाहीं वळविलें व सत्प्रवृत्तींत नाहीं गुंतवून ठेविलें तर तें दुष्टपणाच्या नाना कारवाया करूं लागेल! शेवटीं तुमच्या नाशास कारण होईल.

मनांत विषयवासना व नानाप्रकारचे विकार व विषय क्षणोक्षणीं जागे होतात. त्यांना निश्चयपूर्वक दबवलें पाहिजे. सुखलालसा, इंद्रियलोलुपता ही नाशाप्रत नेणारी असते. त्यामुळें क्षणिक आनंद मिळतो आणि मग अपरंपार दुःख.

भगवंतांनीं गीतेंत मनाचें मनुष्याचें नुकसान करण्याचें सामर्थ्य परोपरीनें कथन केलें आहे. मनावर संयम ठेवण्याबद्दल बजाविलें आहे.

**असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः ।**
**वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ॥**

योगाची, इष्टसिद्धीची प्राप्ति कोणाला होते? जो मनुष्य मनावर संयम ठेवूं शकत नाहीं, त्याला योग किंवा कोणतीही सिद्धि प्राप्त होणार नाहीं. ज्यानें मनावर संपूर्ण संयम ठेविला व जो प्रयत्नशील आहे त्याला योगाची किंवा इष्टसिद्धीची प्राप्ति होत असते.

प्रलोभनापासून तुम्हीं आपली सुटका कशी करून घ्याल? मनाचे खेळ व त्यावर ताबा मिळविण्याची आवश्यकता या संबंधानें सांगितलेंच आहे. तुमचें लक्ष परमात्म्याकडे लागून राहिलें पाहिजे. तेंच खरें सुखनिधान व सर्वस्व वाटलें पाहिजे व त्याचें ध्यान व मनन आपण सतत करीत राहिलें पाहिजे. हा एक अभ्यास आहे. आणि अभ्यास हाच शेवटीं शाश्वत सुखाला कारण होत असतो. तुम्हांला भगवंताच्या नामस्मरणांत गोडी वाटूं द्या. तें नामस्मरण सर्व प्रलोभनांपासून तुमचें रक्षण करील.

# सर्वश्रेष्ठ संत कोण ?

—गुरुदेव डॉ. आर. डी. रानडे

**गुरुदेव रानडे हे एक थोर सत्पुरुष होऊन गेले. 'कन्नड वाङ्मयांत ईश्वराकडे पोहोंचण्याचे मार्ग' Pathways to God in Kannad Literature या त्यांच्या अलिकडेच प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांत सर्वश्रेष्ठ संत कोण ? या विषयावर त्यांनीं उद्बोधक चर्चा केली असून तिच्या आधारें पुढील लेख तयार करण्यांत आला आहे.**

संतपण ही एक महत्त्वाची मानवी अवस्था आहे; ही अवस्था सर्व धर्मांतून संभवते. सर्व धर्मांत संतकोटींत गेलेली माणसें आढळून येतात; होय; संत सर्व कांहीं सारखेच नसतात. त्यांच्यापरी त्यांचें वागणें सवरणें वेगळेंच असतें. कोणाच्या ठायीं कोणता, तर दुसऱ्या ठायीं दुसरा कोणता तरी गुण प्रामुख्यानें आढळून येतो; परंतु साधुत्वाचा सुगंध साधुत्वाचे मूलभूत गुण सर्वत्र सारखेच असतात.

## संत ईश्वरभक्त असतोच

संताची पदवी उगाच नाहीं प्राप्त होत. अशा कितीतरी गोष्टी आहेत कीं ज्यापासून संतपदाला पोहोंचलेल्यानें सर्वस्वी दूर दूर राहिलें पाहिजे. किंवा असेंही म्हणतां येईल कीं, ज्याच्या वाऱ्याला अमुक गोष्टी उभ्या रहात नाहींत तोच संत होय. एवढें मात्र खरें आहे कीं, प्रत्येक संत परमेश्वराचा परमभक्त असतोच असतो. असें असलें तरी अशा कांहीं लहानसहान व टाळण्यायोग्य गोष्टी आहेत कीं संतानें त्यांच्यापासून चार पावलें दूरच राहिलें पाहिजे.

येथें आमच्यापुढें एक भक्तीपर गीत आहे. त्यांत दहा संतांचा नामनिर्देश करण्यांत आलेला आहे. 'भक्तप्रल्हाद' हें नांव कोणी ऐकिलें नाहीं ? प्रल्हादाची कथा कोण जाणत नाहीं ? कवीनें त्या पदांत प्रल्हादाला सर्वांत उच्चस्थान दिलें आहे. सर्वोच्च कोटीप्रत पोहोंचलेले असे भक्त प्रल्हाद होते. हेंच पहा ना. आपण ध्रुव बाळाकडे वळूंया. तो देवभक्तीकडे कां बरें वळला ? राग, संताप हें त्याचें कारण होतें. सावत्र आईकडून अपमानास्पद वागणूक घडली, वडिलांच्या मांडीवरून तिनें त्याला ढकललें. त्याला चीड आली. तो तडक उठला आणि त्यानें अरण्यवास पत्करला. राज्याचा आणूनबुजून त्याग केला; परंतु त्यामुळें तो स्वानंद साम्राज्याचा मालक झाला. ध्रुवानें अढळपद मिळविलें.

**नारदांची भक्ति**

नारद हाही भगद्भक्त. नामसंकीर्तन हें त्याचें भांडवल होतें. नामस्मरण हें त्याच्या-ठायीं स्वाभाविक होतें. परंतु त्याच्यांत होता एक दुर्गुण. तो जेथें जायचा तेथें भांडणें लावायचा आणि या गुणाला चांगला कोण बरें म्हणेल? साधुत्वाला शोभणारा हा गुण नव्हेच नव्हे.

आणि नंतर आपण वळूं या तीन पौराणिक कालांतील थोर संताकडे. व्यास, वसिष्ठ व शुक. अठरा पुराणांचा कर्ता या नात्यानें व्यास मुनींची ख्याति आहे. परंतु इतकीं पुराणें लिहूनही त्याचें संपूर्ण समाधान होऊं शकलें नाहीं, कारण त्याला भगवंताची प्रत्यक्ष भेट होऊं शकली नव्हती.

वसिष्ठापुढें ज्ञान व कर्म यांची सांगड घालण्याचें महान् कार्य होतें. त्यानें भक्तीला फारसें महत्त्व दिलें नाहीं. त्यामुळें संत मालिकेंत महत्त्वाचें स्थान त्यांना मिळूं शकलें नाहीं. शुक हा केवळ ज्ञानोपासक होता. केवळ ज्ञानसंपन्न असून भागत नाहीं. केवळ ज्ञान हें भगवंताप्रत नेऊं शकत नाहीं. तेव्हां व्यास, वसिष्ठ व शुक यांची गणना संत मालिकेंत उच्च पदावर करतां येणार नाहीं.

**भीष्माचार्य व अर्जुन**

नंतर आपण महाभारतांतील थोर संतांकडे वळूंया. प्रथम भीष्माचें नांव आपल्या दृष्टीसमोर येतें. महान राजशक्ति त्यांच्या पाठीशीं खडी होती. कौरव-पांडवांचे ते आजोबा होते. असें असतांहि ते दुर्योधनाचे अंकित होऊन राहिले होते. कौरवांकडून घडलेल्या दुष्कृत्यांना त्यांचा पाठिंबा होता. अंतकाळीं बाणांच्या शय्येवर पहुडले असतां ते देवाचें नांव सतत घेत होते. परंतु तत्पूर्वी त्यांच्याकडून जी कृति घडली त्यामुळें त्यांनाही संतमालिकेंत महत्त्वाचें स्थान देतां येत नाहीं.

अर्जुन भगवद्गीतेंच महत्त्वाचें स्थान पटकावून राहिला आहे. तो एक राजभक्त होता. कृष्णाला तो आपला सखा मानीत होता आणि सखा या नात्यानें कृष्णाला त्यानें सारथ्यपद दिलें होतें. अशा अर्जुनालाहि संतमालिकेंत महत्त्वाचें स्थान देणें योग्य होणार नाहीं.

**हनुमंताचें भक्तमालिकेंत स्थान**

आणि नंतर आपण वळतों वाल्मिकी व हनुमान यांच्याकडे. वाल्मिकीनें आपल्या सर्वांगावर मोठें वारूळ वाढूं दिलें. त्याच्याकडून पूर्वायुष्यांत महान पापें घडलेलीं होतीं. तीं त्याला मधून मधून आठवत असत. वाल्मिकीच्या ठायीं तो एक दोष होता.

होय; हनुमंताची योग्यता भक्त व संत या नात्यानें फारच मोठी आहे. आणि तरीही त्यांच्या ठायीं एक लहानसा दोष होताच. ते आपल्या मालकाच्या सर्वस्वी आधीन झालें होते. स्वतःचें असें अस्तित्व त्यांनीं शिल्लक ठेविलें नव्हतें. ते अयोध्येंत आले तेव्हां सीतामाईनें बेहेष खूष होऊन त्यांना बक्षिसादाखल

# श्रीगुरुग्रंथांतील नामदेवाची वाणी

अनुवादक : गणेश विष्णु कविटकर, एम्. ए.

: १६ :

हे माधवा ! पतितांचा उद्धार करणें हें तुमचें ब्रीद आहे. ज्या मुनिजनांनीं माझ्या प्रभूचें चिंतन केलें तें धन्य होत. देवांना, मानवांना आणि मुनिजनांना जे चरण दूर आहेत त्या श्रीहरि–चरणाची धूळ माझ्या मस्तकीं लागावी–हे माधवा ! तूं दीनावर दया करणारा आणि गर्वाचा परिहार करणारा आहेस. मी तुझ्या पायांजवळ शरण आलों आणि तुझ्यावरून मी माझा देह ओवाळून टाकला आहे.

: १७ :

ईश्वर जवळ आहे असें कोणी म्हणतात, तर तो दूर आहे असेंहि सांगतात. ही चर्चा म्हणजे पाण्यांतील मासे वाळवंटांत खजूर खातात असें म्हणण्याइतकीच व्यर्थ आहे. अरे ! अर्थशून्य बकवा कशासाठी करीत आहांत ! ज्यांनीं श्रीहरीची प्राप्ति करून घेतली त्याला हृदयांत साठवून, लपवून ठेवला आहे. विद्वान म्हणविणारा पंडित-वर्ग वेदांची स्तुति करण्यांत गढून गेला आहे; पण अज्ञ नामदेवानें मात्र ईश्वरास ओळखलें.

---

रत्नहार दिला. तो घेऊन हनुमंतानें काय बरें करावें ? एकेक रत्न घेऊन त्यांत आपला 'राम' आहे का म्हणून तो फोडून पाहूं लागला; आणि अशा रीतीनें त्या साऱ्या बहुमोल रत्नांची त्यानें विल्हेवाट लावून टाकिली ! याला काय बरें म्हणावयाचें ! एवढी एक घटना सोडली तरी हनुमंताच्याठायीं नांव ठेवायला बिलकूल जागा नाहीं.

### संतांत श्रेष्ठ संत प्रल्हादच

आणि आतां शेवटीं पुन्हां भक्तराज प्रल्हादाकडे आपण वळूं या. तेथें नांव ठेवायला तुम्हांला जरासुद्धां आधार सांपडणार नाहीं. त्याची भगवत्‌भक्ति अनन्य-साधारण होती. आंत, बाहेर सर्वत्र त्याला भगवंताशिवाय दुसरें कांहींएक दिसत नसे. सर्व कांहीं ईश्वरार्पण हाच त्याचा खाक्या होता. त्या प्रकारची शरणागति हवी आहे. ती जेथें पराकोटीला पोहोचली तेथें कोणीही असो; त्यानें उच्चतम स्थान मिळविलें म्हणून समजावें.



182

: १८ :

रामनामाचा जप केल्यानें कोण कलंकित, अगर दोषयुक्त राहिला आहे काय? रामनामोच्चारानें पापीसुद्धां पवित्र झाले. नामदेव ईश्वर सान्निध्यांत असल्यानें लोकांना हें निश्चयपूर्वक सांगत आहे. एकादशीचें व्रत न करतां तीर्थयात्रा फक्त करावयाच्या, याला काय अर्थ आहे! नामदेव म्हणतात, पूर्वसुकृतानें मला सद्बुद्धि लाभली. श्रीगुरूंच्या उपदेशानुसार रामनामाचा जप केल्यास वैकुंठाप्रत कोण जाणार नाहीं!

: १९ :

तीन शब्द गटावरील ही एक करामत आहे :

१. कुंभाराच्या घरीं मडकी ( हांडी ), राजवाड्यांत हत्ती ( सांडी ) तसेंच ब्राह्मणाच्या घरीं विधवा ( रांडी );

२. वाण्याच्या दुकानांत हिंग, म्हशीच्या डोक्यावर शिंग आणि शंकराच्या देवळांत लिंग;

३. तेल्याच्या घरांत तेल, जंगलांत वेल, आणि माळ्याच्या घरीं केळ.

नामदेव म्हणतात, वर उलेख केलेल्या वस्तूंचें आपापल्या ठिकाणीं किती महत्त्व आहे! तितकेंच महत्त्व संतमंडळांत गोविंदाचें, गोकुळांत श्रीकृष्णाचें आणि नामदेवांच्या हृदयांत वास करणाऱ्या प्रभुचें आहे.

: २० :

सर्व समर्थ परमेश्वरा! तुझें नाम ही माझी आंधळ्याची काठी आहे. मी गरीब आहे. मी अनाथ आहे. तुझें नाम हाच माझा आधार आहे. तूं दयाळू आहेस; तूं कृपाळू आहेस. ईश्वरा, तूं सर्वश्रेष्ठ आहेस, तूं माझ्या भोंवतीं सर्वत्र आहेस. तूं कृपेचा सागर आहेस. तूं दाता आहेत. तूं धनवान् आहेस. देणारा व घेणारा तूंच आहेस, तुझ्याशिवाय दुसरा कोणी नाहीं. तूं सर्वज्ञ आहेस. तूं त्रिकालदर्शी आहेस. तुझ्या कर्तृत्वासंबंधीं आणि सामर्थ्याबद्दल मी काय कल्पना करूं? नामदेवाचा स्वामी श्रीहरी क्षमाशील आहे.

: २१ :

द्वारकेंत श्रीकृष्णाची भेट झाली असतां त्यांना उद्देशून नामदेव म्हणतात, हे मित्रा! हे देवा! तुमचं क्षेमकुशल आहे ना? मी माझा देह तुमच्यावरून ओंवाळून टाकतों, माझ्या जिवाचें लिंबलोण करतों. तुमची सेवा, तुमच्यासाठीं कष्ट उत्तम आहेत. तुमचें नामहि उंच आहे. देवा? तुम्हीं कोठून आलांत! तुम्हीं कोठें होतां? व कोठें जात आहांत? द्वारका नगरीस रासक्रीडा पाहाण्यास तर जात नाहीं ना? तुमचें शिरोभूषण किती सुंदर आहे? तुमचें शब्द किती गोड आहेत! या द्वारका शहरांत एवढें कां बरें? या हजारो लोकांमध्यें सावळ्या वर्णाचा एक बादशहा आहे, त्यालाच मी ओळखतो. तो अश्वपति सूर्य, गजपति इंद्र आणि नरांचा नरेंद्र ( राजा ) आहेच. पण तो सर्व विश्वाचा धनीही आहे. नामदेवांचा हा स्वामी सर्वांना मुक्ति देणारा आहे.

—:०:—

# श्रीरामकृष्ण उपनिषद् –६

**भगवान् श्रीरामकृष्ण परमहंस यांचीं बोधवचनें म्हणजे उपनिषदेंच होत. श्री. सी. राजगोपाळाचारी यांनीं अधिकारवाणीनें त्यांचें सुंदर विवेचन केलें असून त्याचा अनुवाद आमच्या वाचकांसाठीं साईलीलेंतून क्रमशः देण्यांत येत आहे.**

**—संपादक**

भगवान् रामकृष्ण परमहंस हे सर्व स्त्रियांकडे जगन्मातेच्या दृष्टीनें पहात असत. निरनिराळ्या स्वरूपाच्या स्त्रिया म्हणजे त्यांना तीं देवीचीं विविध स्वरूपें वाटत असत. प्रत्येक स्त्रीच्या रूपानें देवताच आपल्यापुढें असते. तुम्ही आपल्या सभोंवार ज्या विविध स्त्रिया पहातां तीं जगन्मातेचींच विविध स्वरूपें असतात. तेव्हां ज्या ज्या वेळीं एखादी स्त्री तुमच्या दृष्टीस पडेल, त्या त्या वेळीं तुम्हीं जगदंबा मातेच्या मंदिरांत ज्या भावनेनें तिच्या दर्शनासाठीं जातां तोच भाव तुम्हीं एखादी स्त्री पहाल त्यावेळीं तुमच्या अंतःकरणांत जागा झाला पाहिजे. स्त्रीला पहातांच मला माता जगदंबेचें दर्शन घडलें हीच भावना जागी झाली पाहिजे. तुम्हांला भेटणाऱ्या, तुमच्या दृष्टी समोर येणाऱ्या स्त्रिया ! सुस्वभावी, सदाचरणी असोत किंवा दुष्ट स्वभावाच्या व दुराचरणी असोत; तीं जगदंबेचीं स्वरूपें आहेत असें मानून त्यांच्या पुढें अदबीनें, आदरानें मान वांकविल्याशिवाय राहूं नका. त्यांना शिव्यांची लाखोली वहाण्याचा किंवा त्यांच्यावर स्तुति सुमनांचा वर्षाव करण्याचा मला किंवा तुम्हांला कसला आला आहे अधिकार ? या जगाच्या निर्मितीला जी कारण झाली, हें जग जिच्यामुळें निर्माण झालें, त्या देवीचा हा सारा खेळ आहे. तो आपणांस अगम्य आहे. तिच्या इच्छेपुढें सादर मान वांकविणें एवढेंच आपलें कर्तव्य. साऱ्या स्त्रिया म्हणजे त्या देवीचींच विविध स्वरूपें आहेत. मंदिरांतील किंवा मखरांतील महिषासुरमर्दिनीला फुलापानांनीं तुम्हीं शृंगारतां आणि तिची भक्तिभावानें पूजाअर्चा करतां, आणि त्याच भगवती देवीचीं हीं विविध जिवंत स्वरूपें आहेत. मग त्याच भक्तिभावानें त्यांच्याही पुढें वाकायला नको काय ?

'वेळोवेळीं स्त्रियांशीं आमचा संबंध येतो, गुरुदेव ! आम्हीं त्यांच्याशीं वागावें तरी कसें हेंच समजत नाहीं !' एका शिष्यानें पुनश्च गुरुदेवांना प्रश्न केला.

'ज्यानें देवाशीं संबंध जोडला आहे व ज्याला कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत त्याच्या दर्शनाचा लाभ झालेला आहे, त्यानें स्त्रियांबद्दल भय बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. तो साऱ्या स्त्रियांकडे जगन्मातेच्याच दृष्टीनें पाहील. जगन्माताच या विविध स्वरूपांत नटून थटून आपल्यासमोर आली आहे, या पवित्र भावनेनें तो प्रत्येक स्त्रीकडे

पाहील व त्यांना पूज्य समजून आपलें अंतःकरण त्या भावनेनें प्रफुल्लित करील. आपल्या मातेकडे तो ज्याप्रमाणें पाहील व तिची सेवा करील, त्याच भावनेनें तो प्रत्येक स्त्रीकडे पाहील.'

"गुरुदेव! सांगणे सोपें, परंतु आचरण होणें कठीण दिसतें! मनांतील पापी विचार कसे घालवून द्यावयाचे!" शिष्यानें पुन्हां दुसरा प्रश्न केला.

यावर गुरुदेव म्हणाले, 'बाबारे! आतांपर्यंत तेंच तर मी तुला परोपरीनें सांगत आहे. जी जी स्त्री तुझ्या दृष्टीस पडेल ती ती माझी माता आहे असें मान. तिच्या चरणावर आदरानें मस्तक ठेव; तिला भक्तिभावपूर्वक प्रणाम कर. या भावनेमुळें तुझ्या मनांत पापी विचारांस सहसा थारा मिळणार नाहीं.'

× × ×

'विवाहित त्याचप्रमाणें आपल्या पतीबरोबर रहात असतांहि कांहीं स्त्रिया ब्रह्मचारी कुमारिकांप्रमाणें जीवन घालवीत असतात. खरोखर त्या देवताच होत.' एकदां एका शिष्यानें श्रीरामकृष्णास विचारलें कीं, 'कांहीं लोक तंत्रपद्धतीला अनुसरून स्त्रियांच्या सहवासांत रहातात व देवीच्या प्राप्तीसाठीं साधना करीत असतात. हा मार्ग आपणास पसंत आहे का!'

बंगालमध्यें व इतर कांहीं ठिकाणीं शाक्तमार्गानें शक्तीची, जगदंबेची उपासना व तन्निमित्त साधना करणारीं कांहीं दुराचारी माणसेंहि असूं शकतात. आणि अशा लोकांना उद्देशून शिष्यानें वरील प्रश्न विचारला, त्या प्रश्नाचें उत्तर देतांना जणूं काय धोक्याची सूचना देतांना श्रीरामकृष्ण म्हणाले, 'हें साधनेचें एक भयंकर स्वरूप आहे. सर्वसाधारण माणसांचा तो मार्ग नव्हे. वाटेल त्यानें त्या मार्गानें जाण्याचें धाडस करूं नये तो खांच खळग्यांचा मार्ग आहे. त्या मार्गानें जात असतां पापकर्दमांत डुबून जाण्याचें फार मोठें भय असतें. तंत्रपद्धतीनें देवीची उपासना करण्याचा तो मार्ग आहे. स्त्री म्हणजे शक्ति. आणि त्या नात्यानें तिची उपासना करावयाची. हा मार्ग यशस्वी रीतीनें कसा बरें आक्रमण करतां येईल! त्याचे तीन मार्ग आहेत. पहिला मार्ग म्हणजे भक्तानें पुत्राच्या नात्यानें वागावयाचें. आईला ज्या प्रेमानें व भक्तीनें आपण मानतों व तिच्याशीं वागतों, त्याच प्रेमभावानें वागावयाचें. किंवा दुसरा मार्ग म्हणजे मित्रत्वाचें नातें जोडून त्या पूज्य भावनेनें सर्व व्यवहार करावयाचे.

या सर्वांत उत्तमोत्तम मार्ग म्हणजे पहिलाच होय. स्त्री ही आपली माता आहे व आपण तिचें संतान ही भावना अंतःकरणांत दृढमूल करून तिलाच शेवटपर्यंत चिकटून रहावयाचें. त्याच नात्यांत सर्वस्वीं विरून जावयाचें. हा उत्तमोत्तम व सर्वश्रेष्ठ मार्ग होय. मित्रत्वाच्या नात्यानें वागणें हा त्याच्या खालोखाल महत्त्वाचा मार्ग होय.

याशिवाय आणखी तिसरा एक मार्ग आहे. पतीपत्नीचा संबंध जोडणें व त्या नात्यानें वागणें. परंतु हा मार्ग महाभयंकर आहे. त्या मार्गानें जाण्याचें धाडस कोणीही करूं नये.

आपण मंदिरांत जाऊन देवीची, जगदंबेची भक्ति करतों त्याचप्रमाणें जिवंत स्त्री हीच देवता समजून साधनेंत तिचा उपयोग करावयाचा, असा हा तांत्रिक साधनेचा एक मार्ग आहे. हा गुप्त मार्ग आहे.

परंतु श्रीरामकृष्ण परमहंस हे हा मार्ग महा कठीण आहे म्हणून त्या मार्गानें जाणाऱ्यांस धोक्याची सूचना देतात. स्वतःचे यासंबंधीं अनुभव सांगतांना ते म्हणतात, 'या तांत्रिक साधनेंत मी दोन वर्षे घालविलीं आहेत. त्या मार्गातून मी गेलों आहें. पुत्र व मित्र या दोन्हीं नात्यानें मी अनुभव घेऊन पाहिला आहे. परंतु पुत्र भावना ही अत्यंत उपकारक व तारक आहे असें मला शेवटीं आढळून आलें. मी देवीची उपासना स्त्री ही माझी पत्नी आहे या भावनेनें केव्हांही केली नाहीं. तो अत्यंत कठीण व धोक्यांत पाडणारा मार्ग आहे. त्या मार्गानें कोणीही जाण्याचें धाडस करूं नये एवढेंच मला सुचवायचें आहे. कोणी एकाने त्यांना विचारलें कीं, " आपल्या पत्नीबरोबर तुम्ही गृहस्थाश्रम कां चालवीत नाहीं ? "

त्यांनीं एक लक्षानशी गोष्ट सांगून आपला मनोदय प्रगट केला. ते म्हणाले, एके दिवशीं शिवपुत्र गणेशानें एका मांजराला नखानें ओरबडलें. त्यानंतर गणेश आपली आई पार्वती हिच्याजवळ गेला आणि पहातो तों काय ? तिच्या गालावर ओरखडे उठलेले होते ! तें पाहून तो म्हणाला, " आई ! तुला ओरबडलें कोणी ! हे ओरखडे कोठून आले ! "

पार्वती म्हणाली, " बाळा ! ही तुझीच करामत ? तूं आपल्या बोटांच्या नखांनीं मला ओरबडलेंस त्याच्याच या खुणा ! '

' असें कसें होईल आई ! मी कां म्हणून तुला नखं लावीन ? आणि हें कर्म माझ्याकडून केव्हां घडलें तें तरी सांग ? गणेशानें काकुळतीनें विचारलें.

' माझ्या लाडक्या ! तूं इतक्यांतच कसा बरें विसरलास ? तूं त्या मांजराला नखांनी ओरबडलेंस त्याचा इतक्यांतच तुला कसा विसर पडला ? ' ' होय; मी मांजराला नखांनीं ओरबडलें हें अगदीं खरें आहे; परंतु त्याचा तुझ्याशीं काय संबंध ? ते ओरखडे तुझ्या गालावर कां म्हणून उमटावे ? ' आश्चर्यानें गणेशानें प्रश्न केला,

पार्वती म्हणाली, " बाळा ! अरे सारें जग म्हणजे माझेंच शरीर होय. एखाद्यानें एखाद्या माणसास किंवा प्राण्यास जखम केली असतां ती मलाच होते. तें दुःख मला भोगावें लागतें."

आणि हें ऐकल्यानंतर गणेशास कोणाहि बरोबर लग्न करावें असें वाटेना. जी जी स्त्री त्यानें पाहिली ती ती त्याला आपल्या मातेप्रमाणें वाटूं लागली. अखिल स्त्री जात म्हणजे त्याच्या हिशोबी जगन्माता होय आणि त्यामुळें त्यानें विवाहबद्ध होण्याचा विचारच सोडून दिला. त्याचप्रमाणें, माझ्याहि दृष्टीला प्रत्येक स्त्री पार्वतीप्रमाणें वाटते. प्रत्येक स्त्रीच्याठायीं मला पार्वतीचें स्वरूप दिसतें. त्याला मी काय करूं !

---

# संत समागम गोड

## पाषाणाचा नंदी कडबा खाऊं लागला

**संत एकनाथ महाराजांच्या जीवनांत कितीतरी आश्चर्यकारक घटना घडून आल्या. त्यांच्या सहवासांत जितका वेळ घालवावा तितका तो थोडाच होईल. शेगांवचे श्रीगजानन महाराज हेही आधुनिक काळांतील एक थोर संत होऊन गेले. त्यांच्या जीवनाशींही क्षणकाल समरस होण्याचा आपण प्रयत्न करूं या. संत-समागम हा नेहमींच गोड व फायदेशीर होणारा असतो.**

एकनाथ महाराजांच्या वेळीं पैठणांत एक संन्यासी राहत असे. त्याची वहिवाट अशी होती कीं, कोणीही भेटो, त्याला भेटलेल्यास लोटांगण घालावयाचें. त्यामुळें लोक त्यास 'दंडवत' म्हणत असत. त्याचें बाह्य वर्तन एखाद्या पिसाटासारखें असे. लोकही त्याची अंतःस्थिति न ओळखतां त्यास वेडाच समजत असत. या दंडवत संन्याशाची नाथांच्या ठायीं फार प्रीति असून तो प्रत्येक दिवशीं नियमानें त्यांच्या दर्शनास येत असे, व लहर लागेल तेव्हां पुराणश्रवणासही बसत असे.

### मेलेल्या गाढवास दंडवत

एके दिवशीं तो संन्यासी गोदेवर गेला असतां, आपल्या नियमाप्रमाणें, दृष्टीस पडेल त्या प्राण्यास लोटांगण घालूं लागला. तेव्हां त्याची थट्टा करावी या उद्देशानें तेथें जमलेल्या भटजींनी जवळच एक मेलेलें गाढव पडलें होतें तें त्यांस दाखवून त्यास लोटांगण घालण्यास सांगितलें. संन्याशानें आपल्या नित्यनियमाप्रमाणें त्या गाढवासही लोटांगण घातलें, तेव्हां ब्राह्मण त्यास म्हणाले, 'ह्या मेलेल्या गाढवास लोटांगण घालून काय उपयोग? त्यापेक्षां तुमच्या अंगांत सामर्थ्य असेल तर गाढवास जिवंत करा आणि मग लोटांगण घाला.' ब्राह्मणांच्या कुचेष्टा बुद्धीकडे लक्ष न देतां संन्याशानें तें गाढवाचें मढें आपल्या हातानें थोपटलें, तोंच असा चमत्कार झाला कीं, तें गाढव खरोखरच जिवंत झालें. आश्चर्यचकित होत्साते ब्राह्मणांचे थवेच्या थवे नाथगृहीं जाऊन त्यांनीं ती हकीकत नाथांस कळविली. 'या कलिकालांत अशी गोष्ट करणें योग्य नाहीं.' असें म्हणून नाथ गोदातिरीं आले. त्या संन्याश्याच्या सभोंवतालीं गर्दी झालेली असून, लोक त्याच्या दैवी सामर्थ्याची चर्चा करीत आहेत असें त्यांस दिसलें.

### नाथांची चिंता

नाथ म्हणाले, 'झाला हा प्रकार चांगला नाहीं. कारण, याचा परिणाम असा होईल कीं, ज्यांच्या घरचीं माणसें यापुढें मरतील ते सगळे याजपाशीं येऊन आमचें

माणूस उठवा म्हणून धरणें धरून बसतील. इतकेंच नव्हे, तर याच्या अंगीं अशी विलक्षण शक्ति असल्यामुळें एखादे वेळीं हा आपणांस त्रासदायक होईल. या विचारानें यवनराज्यकर्ते यास कदाचित् बंदींत देखील नेऊन टाकतील. इतकें बोलून नाथांनीं त्या संन्याश्यास हातीं धरून बाजूस नेलें व म्हटलें, आतां तुम्ही या देहीं, या वेषानें, या लोकीं राहणें धोक्याचें आहे.' संन्याशी म्हणाला, 'ठीक आहे मी आतां याच घटकेस समाधी घेतो.' नाथांस हा विचार पसंत पडला.

मग त्यांनीं कामाठी लोकांस बोलावून गोदातीरीं संन्याश्याच्या समाधीची तयारी केली. व संन्याशानें नाथांच्या देखत समाधिस्त होऊन देहत्याग केला. पण यामुळें दुसरेंच एक विघ्न उपस्थित झालें. नाथांचा छळ करण्यास ब्राह्मणांस हें एक आयतेंच साधन मिळालें. ते मोठ्या क्रोधानें नाथांस म्हणाले, 'मृत प्राण्यांस जिवंत करण्याचें सामर्थ्य या संन्याश्याच्या अंगीं असतां तुम्ही त्याला समाधि दिली, ती कोणत्या शास्त्राच्या आधारानें ? या कृत्याला तुम्ही योग्य शास्त्राधार दाखविला नाहीं तर तुमच्या हातून ही हत्या घडली असें समजून आम्ही तुमच्यावर बहिष्कार घालूं.'

## नाथांचा कमालीचा शहाणपणा

ब्राह्मणांस हात जोडून नाथ म्हणाले, 'तुम्ही समर्थ ब्राह्मण. तुमच्यापुढें माझा दीनदुबळ्याचा काय पाड लागणार ! मी शास्त्र पाहिलें नाहीं किंवा ऐकलेंहि नाहीं. तेव्हां मी तुम्हांस शास्त्राधार कोठून दाखवूं ? पण ह्या कृत्यामुळें मी पतित झालों असें जर तुम्हांस वाटत असेल तर मला पावन करण्याचें सामर्थ्य तुमच्या चरणतीर्थांत आहे.' परंतु या नम्रपणाच्या भाषणानें ब्राह्मणांचा क्रोधानल शांत झाला नाहीं. उलट नाथांचा शांतपणा पाहून त्यांना अधिकच चेव आला. ते म्हणाले, 'असल्या शब्दपांडित्यानें आमचें समाधान होणार नाहीं. तुमच्या हातून आतांच जें पातक घडलें त्याचें निरसन अगोदर झालें पाहिजे.

छळछळूनि बोलती वचन । केव्हडें याचें धैर्य पूर्ण ।
परमहंसासी पुरून । निश्चित आपण बैसला ॥
वेदशास्त्रीं नसतां गति । उगेंचि वर्तावें उद्धतीं
वाढवूनियां महंति । नाडिलें निश्चिती जगातें ॥
नुसत्या नामाचा पाठ । सांगोनि करविला बोभाट ।
लोक केले रे कर्म भ्रष्ट । ब्राह्मण्य स्पष्ट बुडविलें ॥
एक म्हणती अहो ऐका । परमहंस पुरितां आवांका ।
उपजला जैं विवेका । तुमचा निका पुरषार्थ ॥
ऐसें तुमचें पूर्णपण । तरी आतां दावा हें करून
पाषाण नंदीकडून । करावें भक्षण कडबाडें ॥

## रेड्यानें कडबा खाल्ला !

येवढेंच बोलून ब्राह्मण थांबले नाहींत, तर त्याच ठिकाणीं पूर्वी रेड्याच्या तोंडून ज्ञानेश्वरांनीं वेद बोलविले होते. या गोष्टीचीही आठवण नाथांस त्यांनीं करून दिली व

म्हटलें, " ज्ञानदेवाप्रमाणें तुमचेंही ज्ञान जर खरें असेल तर या पाषाणाच्या नंदीकडून तुम्ही गवत खाववून दाखवा." इतकें बोलून ब्राह्मणांनीं एक कडब्याची पेंडी नाथांपुढें आणून ठेविली ! नाथांचा अगदीं निरुपाय झाला. ते कडब्याची पेंडी हातीं घेऊन नंदीपाशीं गेले. आणि म्हणाले, "तुझ्याकडून ही कडब्याची पेंढी मी खावावी अशी या भूदेवांची आज्ञा आहे. तेव्हां या आज्ञेस तूं मान दिला पाहिजेस." नाथांच्या तोंडचे येवढे शब्द कानीं पडतांच त्या पाषाणाच्या नंदीनें जीभ बाहेर काढून कडबा भक्षण केला ! पराती सारखी तोंडें करून ब्राह्मण हा प्रकार पहात होते. कडबा खाऊन झाल्यावर नंदी चालत गेला व गोदेच्या डोहांत त्यानें उडी घेतली !

ब्राह्मणांनीं नाथांवर उगारलेलें बहिष्कारशस्त्र निमूटपणे मागें घेतलें.

× × ×

**शेगांवच्या श्रीगजानन महाराजांची गोष्ट.**

एकदां समर्थस्वारी आपला परमभक्त हरि पाटील, तसेंच जगू आबा, बापूना काळे व इतर पन्नास मंडळीसह आषाढी एकादशीच्या यात्रेसाठीं पंढरपुरास निघाली व ही सर्व मंडळी नागझरीहून आगगाडीनें पंढरपुरीं आली. कुकाजी पाटलांच्या वाड्यांत उतरली. यात्रा अतिशय मोठी आणि पांडुरंगाच्या दर्शनाच्या दिवशीं तोबा गर्दी उडाली होती. व्यवस्थेसाठीं हाताहातावर पोलीसही उभे होते. बापून्याशिवाय सर्व मंडळी हरि पाटलाबरोबर दर्शनास निघाली. बापूना स्नानास गेल्यामुळें या मंडळीस चुकला. स्नानाहून परत येऊन पाहतों तों सर्व मंडळी निघून गेलेली. तो तसाच धांवत धांवत देवळाकडे आला. मुंगीलाही वाट मिळणार नाहीं इतकी गर्दी ! मग या बिचाऱ्याला वाट कोण देणार ! त्यांतून याच्या पदरीं गरीबी ! कोण विचारणार त्याला ? बापून्याला अतिशय वाईट वाटून त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. त्यानें विठ्ठलाचा धांवा सुरू केला ' हे विठ्ठला, हृषीकेशी, कां रे मजवर निष्ठूर झालास ाला भेट दे. सांवत्या माळ्यासाठीं तूं आठकोस अरणीस गेलास. मी तर येथें मंदिराजवळच उभा आहे. मग पांडुरंगा ! मला दर्शन दे. तूं अनाथांचा नाथ आहेस ! मग माझी उपेक्षा कां ! ' अशा रीतीनें अंतःकरणपूर्वक तो देवाला आळवीत उभा होता. अखेर हताश होऊन संध्याकाळीं बिऱ्हाडीं परत आला. सबंध दिवसाचें उपोषण तोंडांत पाण्याचा थेंबही नाहीं म्हणून त्याची मुखश्री म्लान झाली होती. सर्व लक्ष विठ्ठलाच्याकडे केंद्रित झालें होतें. शरीरानें जरी तो बिऱ्हाडीं होता, तरी त्याचे मन मंदिरासभोंवतीं भिरीभिरी फिरत होतें. विठ्ठल दर्शनाचा त्याला सारखा ध्यास लागून राहिला होता ! ही त्याची स्थिति पाहून इतर सर्वजण हंसूं लागले. ' शेगांवहून पंढरीस आला व गांवामध्यें नाना खेळ पाहत फिरला. हा बेटा अभागी पूर्ण.' सर्वांनीं त्याची टर उडविली व टोंचून बोलून त्याचा उपहास केला. बापूना दांताला दांत लावून उपाशीच मुपचूप कोपऱ्यांत बसून होता. त्याचें सर्व लक्ष विठ्ठलाकडे लागले होतें. दर्शनासाठीं तो

आर्त बनला होता. गजानन महाराज जवळच निजल्या निजल्या हें सर्व पाहात होते. गरीबाचे सांकडे साधूनांच पडणार. सत्संगती ज्याला घडते तोच खरा भाग्यवान्!

## मी तुला दर्शन घडवीन

समर्थ म्हणाले, 'बापूना, तूं दुःखी होऊं नकोस. ये, मी तुला याच ठिकाणीं आतांच रुक्मिणीरमण भेटवितों' असें म्हणून

'तों महाराज उभे राहिले। कटीं हात ठेविले।
पाय खालीं जुळविले। समचरण दावावया॥
तुळशीफुलांच्या माला कंठीं। मूर्ति सांवळी गोमटी।
बापूनाच्या पडली दृष्टी। शीर ठेविलें पायांवर॥
पुन्हां जो पाहे वरी। समर्थ दिसले पहिल्यापरी।
तेणें बापुनाच्या अंतरीं। अति आनंद जाहला॥
धोतर, पागोटें आणि शेला। जो धरीं दृष्टी पडिला।
तोच त्यानें पाहिला। दर्शना जातां राऊळांत॥'

बापूनानें 'समचरण सरोजं सांद्रनीलां बुदाभं' अशी ती परममनोहर विठ्ठल-मूर्ति समोर उभी असलेली पाहिली. भाळीं बुका, गळ्यांत तुळशीहार, डोईस पागोटें आणि खांद्यावर शेला असें ते सांवळें परब्रह्म पाहून त्याच्या प्रेमास भरतें आलें. अंगावर रोमांच दाटले आणि डोळ्यांतून आनंदाश्रु वाहूं लागले त्याची वृत्ति तदाकार होऊन तो देहभान विसरला.

## तुम्ही बापुनासारखे व्हा!

सर्वजण महाराजांस विनवूं लागले कीं आम्हास असेंच श्रींचे पुनरपि दर्शन होऊं द्या. तेव्हां महाराज काय म्हणतात पहा—

"बापुनासारिखें आधीं मन। तुम्ही करारे आपुलें॥
तें तसें झालियावरी। दर्शन घडवीन निर्धारीं।
ही दर्शन वस्तु खरी। काय मिळे बाजारांत॥
म्हणून ती आणून। देऊं तुम्हां कारण।
निष्पाप करा आधीं मन। तरीच पुढचें घडेल हें॥"

समर्थांनीं बापुनाला साक्षात् विठ्ठल दाखविला.

"संत आणि भगवंत। एकरूप साक्षात्।
गुळाच्या त्या गोडीप्रत। कैसें करावें निराळें?॥

काला करून ही मंडळी माघारी फिरली. गजानन महाराजांच्या कृपेनें पुढें बापुनाला मुलगा झाला. पंढरीचा प्रसाद म्हणून त्यानें त्याचें नांव नामदेव ठेवलें.

# चणे खावे लोखंडाचे–

**भारतांत पूर्वकाळीं गुरुशिष्य संबंध फार वेगळ्या प्रकारचे असत. गुरुकृपा म्हणजे देवकृपा. ती फळास आली म्हणजे जगांत मिळवायचें असें कांहीं रहात नसे; परंतु गुरुकृपा संपादन करणें ही साधी गोष्ट नव्हती. किती खडतर दिव्यांतून शिष्यांना त्याकाळीं जावें लागत असे ! परंतु त्यासाठीं त्यांची पूर्ण तयारी असे. कशी ती पहा.**

प्राचीन काळीं सातव्या आठव्या वर्षीपर्यंत व्रतबंध होतांच मुलांना अर्थात शिष्यांना गुरुगृहीं राहून विद्याभ्यास करावा लागे. कांहीं गुरु संथा किंवा पाठ पद्धतीनें विद्यार्थ्यांस शिकवून त्यांना ज्ञानलाभ करून देत. शिष्यांना गुरुगृहीं सर्व तऱ्हेचीं कामें करावीं लागत. बलराम व श्रीकृष्ण सांदिपनी गुरूंच्या घरीं असतांना जंगलांत जाऊन सर्पणासाठीं लाकडेदेखील तोडून आणीत असत.

गुरु म्हणजे उपदेशकर्ता, मातापिता असून तो परमेश्वररूप आहे असें मानीत. गुरुदेखील शिष्यांकडून अनेक तऱ्हेनें सेवा करून घेऊन त्याची कसोटी पाहत असत. शिष्य कसोटीला पूर्णपणें उतरला म्हणजे ते त्याच्यावर अनुग्रह करीत व हा अनुग्रह मिळतांच शिष्य संपूर्ण ज्ञानसंपन्न होई. कांहीं गुरूंची शिष्यपरीक्षा घेण्याची अभिनव पद्धति असे. धौम्य ऋषींनीं देखील आपल्या तिघां शिष्यांची अशाच तऱ्हेची कडक परीक्षा घेतल्याबद्दल जी कथा उपलब्ध आहे ती फार उद्बोधक आहे. आपल्या शिष्यांची निस्सीम भक्ति पाहून त्यांनीं त्यांच्यावर तत्काल कृपा केली व त्यांच्या मनकामना पूर्ण केल्या.

## धौम्य मुनींच्या आश्रमांत

धौम्यऋषीच्याजवळ अरुणी पांचाळ, बैद्ध आणि उपमन्यु या नांवाचे तिघे शिष्य विविध विद्या व ज्ञान संपादन करण्यासाठीं रात्रंदिवस सेवा करीत राहिले होते.

एके दिवशीं ऋषींनीं अरुणीस शेतास जाऊन साळीच्या शेतीला तळ्याचें पाणी जमीनीस पुरें होईपावेतो पाजविण्यास सांगितलें. गुर्वाज्ञा होतांच तो शिष्य धांवत शेताकडे गेला. पाहतों तर साळी पेरलेली जमीन वर असून पाण्याचा प्रवाह खालून होता. अशा स्थितींत पाणी वर कसें चढेल, या विचारांत तो पडला. लहान मोठे दगड आणून त्या पाण्यामध्यें टाकून त्यानें पाणी अडविण्याचा प्रयत्न केला. पण पाणी कांहीं वर जाईना. पाणी जमिनीला मिळालें नाहीं तर गुरु रागावतील ही धास्ती त्याला होतीच.

अखेर मनाशीं निश्चय करून त्यानें हातानें एका बाजूची दरडी घट्ट पकडून दुसऱ्या बाजूकडे पाय देऊन तो निर्वाण अंतःकरणानें पाण्याच्या प्रवाहाच्या आड पडला आणि मनामध्यें श्रीगुरूंचें ध्यान करूं लागला. असें करतांच पाणी जमिनींतील पिकाकडे वर जाऊं लागलें व गुरूंची सर्व जमीन पाण्यानें भिजून गेली. सूर्यास्त होऊन गेला तरी आपला शिष्य परत न आलेला पाहून गुरुजी आपल्या शेताकडे गेले. सर्व शेत पाण्यानें भरून गेलेलें आहे हें पाहून मनामध्यें त्यांना फार संतोष झाला. परंतु शिष्य कोठेंच न दिसल्यामुळें त्यांना काळजी वाटून त्यांनीं त्यास मोठ्यानें हांका मारण्यास सुरवात केली. वास्तविक शिष्यानें प्रवाहांत पडून शेतांस कसें पाणी पाजविलें होतें हे त्यांनीं अंतर्ज्ञानानें केव्हांच जाणलें होतें. गुरुंच्या हांका कानीं येतांच अरुणी पाण्यांतून उठून त्यांच्याकडे येऊन त्यांस भक्तिपूर्वक नमस्कार करिता झाला. धौम्य ऋषींनें त्यांस प्रेमपूर्वक आलिंगन देऊन वर दिला कीं, शिष्यवरा, सकल विद्या तुझ्या घरीं पाणी भरतील. वेदशास्त्रादि व्याकरणाचें संपूर्ण ज्ञान तुला प्राप्त होईल. असें गुरुनीं म्हणतांच तो शिष्य तत्काल विद्यावंत आणि ज्ञानी झाला. आणि भक्तिभावानें आपल्या गुरुच्याचरणावर लोळण घेऊं लागला. कृपानिधि धौम्य मुनि आपल्या आश्रमात परत आल्यावर त्यास म्हणाले, 'अरुणी, तूं आतां घरीं जाऊन विवाह करून घे आणि सुखानें आपला संसार कर.' गुरूंचा निरोप घेऊन अरुणी पांचाळ आनंदानें आपल्या घरीं गेला.

### रेडा आणि शिष्यवर

दुसरा शिष्य वेद; याच्या अंतःकरणाची परिक्षा धौम्य मुनींनीं अशाच तऱ्हेनें केली. एके दिवशीं त्यांनीं त्यांस शेतांत जाऊन रात्रंदिवस पिकांचें रक्षण करून पीक येतांच तें सर्व धान्य घरीं आणण्यास सांगितलें. साळीच्या धान्याची रास तयार होतांच वेदनें एका गाड्याला रेडा जुंपून त्यांत तें धान्य भरलें. एका बाजूस रेडा व दुसऱ्या बाजूस आपण होऊन तो गाडा ओढूं लागला. रेडा गाडी जलद ओढूं लागला. त्याच्याबरोबर याला ओढवेना. मग त्यानें आपल्या मानेवर जूं बांधून मोठ्या श्रासानें आणि जोरानें गाडा ओढण्यास सुरवात केली. असें ओढत असतां रेडा चिखलामध्यें रुतला. मग आपण एकटाच बळें करून ओढूं लागला. चिखलामध्यें रेडा रुतला म्हणून त्याला फार काळजी वाटूं लागली. आपण गळ्याला फांस पडेपर्यंत जोरानें ओढूं लागला. शेवटीं रेड्याला सोडून देऊन तो स्वतः एकटाच मोठ्या प्रयासानें गाडा वर ओढूं लागला.

गाडा ओढतांना गळ्याला फांस पडून आपला प्राण जातो कीं, काय असें त्याला वाटे. अशा संकटांत तो शिष्य असतांना धौम्यमुनी त्याच्यापुढें येऊन उभे राहिले. त्यांनीं त्याला गाड्यापासून सोडविलें आणि मोठ्या दयार्द्र अंतःकरणानें त्याला आलिंगन देऊन वर दिला कीं, 'तूं वेदशास्त्र संपन्न होशील. वर देताक्षणींच त्याला सर्व विद्या प्राप्त झाली आणि तो वेदशिष्य आपल्या गुरुंचा निरोप घेऊन स्वगृहीं गेला.

### उपमन्यूचें खडतर जीवन

आतां राहिला तिसरा शिष्य उपमन्यु. हा सुद्धां गुरुसेवेविषयीं बहुगुणी होता.

तो गुरूंची सेवा शुश्रूषा फार करीत असे. त्याचा आहार मोठा होता, म्हणून त्याची बुद्धि स्थिर राहात नव्हती. त्याची परीक्षा घेण्यासाठीं धौम्यमुनींनीं एक अभिनय प्रयोग केला. ते त्याला म्हणाले, 'तूं रोज गायी घेऊन रानामध्यें जाऊन त्यांना चारून त्यांचें रक्षण करीत जा.'

आज्ञा होतांच गुरुचरणांवर मस्तक ठेवून गायी गुरें घेऊन तो रानांत गेला. व पुष्कळ दिवसपर्यंत गुरें चरवीत राहिला. भूक लागली म्हणून एखादें दिवशीं गुरें लवकर घरीं परत आणली, तर गुरु त्याच्यावर 'लवकर कां घरीं येतोस' म्हणून रागवत असत. 'सूर्यास्तानंतरच तूं गुरें घेऊन येत जा. असें तूं नित्य करीत जा.' अशी त्याला आज्ञा होती. रानांत असतांना क्षुधाक्रांत झाला असता नेहमीं आपल्या गुरूंचें चिंतन करीत असे. नदींत स्नान करावें, ब्राह्मणांच्या घरीं भिक्षा मागून आपले भोजन करून गुरें राखावीं असा त्याचा नित्यक्रम होता. एके दिवशीं मुनि त्याला म्हणाले, तूं' नित्य उपवास करीत असून तुझा देह इतका पुष्ट कोणत्या कारणानें झाला ते सांग. ब्राह्मण घरीं भिक्षा मागून भोजन करतों व रात्र झाली म्हणजे गुरें चारून घरीं परत आणतों, असें उपमन्यूनें त्यांना सांगितलें. त्यावर गुरुजी म्हणाले.' आम्हांला टाकून तूं कसें भोजन करतोस ? भिक्षा मिळेल ती घरीं आणून देत जा. आणि मग गुरांकडे जाऊन सायंकाळीं त्यांना घेऊन परत येत जा.'

आज्ञेप्रमाणें त्यानें भिक्षा मागून ती घरांत नेऊन दिली. घरीं त्याचें पोटभर जेवण होत नसे. पुन्हा भिक्षा मागून तो पोटभर जेवीत असे. धौम्यऋषींना हें कळतांच त्यांनीं दोन्हीं वेळची भिक्षा घराकडे आणून देण्याचा त्याला हुकूम केला.

### चणे खावे लोखंडाचे

अशा रीतीनें दोन्ही वेळची भिक्षा तो घरीं नेऊन देऊं लागला व आपण निर्धारपूर्वक उपाशीं राहूं लागला. मनांमध्यें तो मुळींच राग, द्वेष आणीत नसे. पुढें पुढें तो वासरें स्तन पीत असतांना त्यांचें उष्टें दूध गळत असे तें दोन्ही हातांत धरून पिऊं लागला. गुरुजींना हें समजतांच उष्टें दूध प्याल्यानें मतिहानी होत असल्यामुळें तें न पिण्याची त्यांनीं त्यास आज्ञा केली. अशा तऱ्हेनें हाही त्याचा आहार नाहींसा झाला. दुसऱ्या दिवशीं भूक लागतांच आतां काय करावें, याचा तो विचार करूं लागला. रुईच्या झाडांतून गळणारा दुधासारखा चीक त्याला दिसला. पानांचा द्रोण करून त्यामध्यें तो भरून त्यानें घेतला आणि तोंडामध्यें घेत असतांना त्याच्या डोळ्यांत तो चीक गेला. यामुळें त्याला दिसेनासें झालें. गुरें दिसेनाशीं झालीं. म्हणून त्याला काळजी वाटूं लागली. चालतां चालतां तो एका आडांत पडला. "आतां मात्र गुरुजी खात्रीनें मला रागें भरतील" म्हणून चिंता करीत तो तसाच पडून राहिला.

सूर्य मावळून अंधार पडला. गुरें आणि शिष्य आला नाहीं म्हणून धौम्यमुनि त्यांच्या शोधास निघाले. रानांत गुरें दिसलीं पण शिष्य दिसेना म्हणून त्यांनीं त्यास हांका मारायास सुरुवात केली. शिष्यानें आडांतूनच त्यांच्या हांकेला साद देतांच कृपाळू गुरु

त्यांच्याजवळ गेले. शिष्याची सर्व हकीकत त्यांना कळली. त्यांच्या आज्ञेप्रमाणें 'अश्विनी' मंत्र जपतांच उपमन्यूला दृष्टीलाभ झाला. त्यानें वर येऊन गुरुचरणांवर लोळण घेतली. साष्टांग नमस्कार करून तो त्यांची नाना प्रकारें स्तुति करूं लागला.

### गुरुकृपेचें फळ

धौम्यमुनींना संतोष झाला. शिष्याला आलिंगून ते म्हणाले, ' हे शिष्यवरा उपमन्यु तुझ्या भक्तीनें मी फार संतुष्ट झालों आहे. नंतर त्यांनीं त्याच्या मस्तकीं हात ठेविला. त्यांच्या हाताचा स्पर्श होतांच त्या शिष्याला तात्काळ वेदशास्त्राचें संपूर्ण ज्ञान झालें. त्यानंतर गुरुजी शिष्याला आशीर्वाद देते झाले, ' आतां विवाह करून सुखानें, आनंदानें घरीं जाऊन संसार कर. जगामध्यें तुझी कीर्ति फार होईल. तुला या जगती शिष्य फार होतील. तुझ्या शिष्यामध्यें उत्तंक नांवाचा शिष्य प्रसिद्धीस येईल. तो तुझी गुरुदक्षिणा म्हणून कुंडलें आणून देईल. सर्पसत्र या नांवाचा याग करून सर्व सर्पांना मारून टाकील.'

असें हें गुरु कृपेचें सामर्थ्य आहे. गुरुची अन्यन्यभावानें भक्ति आणि सेवा करून त्यांच्या चरणीं लीन झालें पाहिजे. गुरुद्रोह केव्हांहि करूं नये. गुरुजीला नेहमीं संतुष्ट राखलें पाहिजे. गुरुद्वेष करणाराला परलोक नाहीं. त्याला नरक प्राप्त होतो. गुरूला संतुष्ट केल्यावर काय मिळत नाहीं ? वेदशास्त्रादि ज्ञानराशी क्षण न लागतां शिष्यास मिळतात. म्हणून कायावाचामनें करून आपण नेहमीं—गुरुसेवेसाठीं तत्पर असलें पाहिजे.

**' गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।**
**गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥ '**

---


**जैसें डोळ्यां अंजन भेटे । ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे ॥**
**मग वास पाहिजे तेथें प्रगट । महानिधी ॥** ज्ञानेश्वर.

हीं कदाचित् कविकल्पना असेल—पण डोळे काळजीपूर्वक तपासून अचुक चष्मा बनवून घेतल्यास, शतायुषी झालांत तर दृष्टि स्वच्छ रहाते हें सत्य आहे.

याकरितां **निर्दोष चष्मे** बनविणार

# शेंडे आणि कंपनी

**बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४.** यांचा सल्ला घेऊन निर्धास्त रहा.
बाहेरगांवीं फ्रेम्स, लेन्सिस् व प्रिस्क्रिप्शनप्रमाणें चष्मे बनवून ऑर्डरप्रमाणें पाठवूं.



# श्री साई स्तवन

—अरुण गोसावी

आम्हीं तुझे दास । तुझ्यापायीं वास ॥
हीच एक आस साई देवा ॥ १ ॥
आम्हीं तुझे बाळ । तूं पिता प्रेमळ ॥
सदा सर्वकाळ । जवळी उभा ॥ २ ॥
आम्हा तुझें मुख । पाहूं लाधो सौख्य ॥
त्यापुढें स्वर्गसुख । तुच्छ भासे ॥ ३ ॥
आम्हा तुझें ध्यान । सदा तुझें चिंतन ॥
तुझ्या नामें मन । तल्लीन होते ॥ ४ ॥
आम्हीं तुझे भक्त । तूं अमुचा भगवंत ॥
दया कृपावंत । साईनाथ ॥ ५ ॥
तुझा महिमा देवा । कैसा कळों यावा ।
म्हणोनी वर्णाया तोंड नाहीं ॥ ६ ॥
वेद जेथें थकती । श्रुती मौन धरती ॥
तेथें कैसी गती । आम्हां हाय ॥ ७ ॥
आम्हीं जैसी पणती । देवा तुज पुढती ॥
म्हणोनी न शक्ती । महिमा वर्णाया ॥ ८ ॥
आम्हा तुझे चरण । काशीहुनी पावन ॥
सर्व ताप हरण । सदा होय ॥ ९ ॥
सर्व सिद्धी शक्ती । तुझ्या पायीं वसती ॥
सर्व तीर्थें असती । चरणीं तुझ्या ॥ १० ॥
आम्हीं पाहे दुर्बळ । तुझ्यामुळें प्रबळ ॥
आम्हीं जगतीं सकल । झालों देवा ॥ ११ ॥

तुझ्या नामें घरा । मुक्ती येती द्वारा ॥
ऋद्धी सिद्धी बाहेरी । तिष्ठती ॥ १२ ॥

नको तुझ्याविण । निर्गुण सगुण ॥
त्रिभुवन सिंहासन । तेंही नको ॥ १३ ॥

नको तुझ्याविण । कुबेराचें धन ॥
वैकुंठ पावन । तोही नको ॥ १४ ॥

कैश्या कैश्या लीला । केल्या तूं दयाळा ।
रोगी मुक्त केला । स्पर्श मात्रें ॥ १५ ॥

दीप तेला वीण । पेटविले जाण ॥
आश्चर्य सर्व जण । मनीं करिती ॥ १६ ॥

धुनींतील ज्वाला । गगनीं जेव्हां भिडल्या ।
तेव्हां सोटा हाणला । सबूर म्हणून ॥ १७ ॥

सबूर म्हणतां अग्नी । शांत झाला तत्क्षणीं
सर्व लोक मनीं । आनंदले ॥ १८ ॥

ऐश्या कित्येक लीला । केल्या तूं दयाळा ॥
मशीदींत केला । अग्निकुंड ॥ १९ ॥

तूं आमुची माउली । कृपेची साउली ॥
प्रेम पान्हावली । साई माय ॥ २० ॥

आम्हा एक द्यावा । हाची वरो देवा ॥
तुझा भक्ती ठेवा । नित्य वसो ॥ २१ ॥

सदा असो प्रेम । मुखीं तुझें नाम ॥
टळो आगम निगम । साईराय ॥ २२ ॥

सर्वांभूतीं देवा । तुझा भाव व्हावा ॥
हाची वरो द्यावा । साईनाथा ॥ २३ ॥

तुझ्या चरणीं अरुण । करी साई नमन ॥
देईंगा दर्शन । साईदेवा ॥ २४ ॥

ऐसें हें स्तवन । झालें देवा पूर्ण ॥
तुझ्या कृपें करून । साईराया ॥ २५ ॥

१८५

—:*:—

# श्रीसाईसच्चरित – गद्यानुवाद



ले० : एक साईभक्त

अध्याय ९ वा ( पुढें चालू )

चित्तांत प्रेम असलें पाहिजे. कोणी कांहीं पदार्थ एखाद्या माणसाबरोबर प्रेमानें आणि भक्तीनें बाबासाठीं पाठविला असला आणि तो माणूस जरी तो पदार्थ त्यांना द्यावयास विसरला तरी बाबाच त्याच्याकडून न चुकतां आठवणीनें मागून घेत असत. भाजी, भाकर, पेढा कांहींहि असो, देणाऱ्याजवळ भक्तिभाव मात्र अपरंपार असला पाहिजे. असा एखादा परमभक्त आढळून आल्यास साईंचें प्रेम उचंबळून येत असे. प्रेमळ भक्तीची ही एक अशीच कथा आहे आणि ती ऐकून मनास आनंद होईल. आपल्या कर्तव्यांत कोणी चुकत असल्यास बाबाच त्याला मार्ग दाखवीत. त्यांची शिक्षण पद्धतीही फार गोड असे आणि योग्यवेळींच ते आठवण देत. असा ज्यांना अनुभव मिळाला ते खरोखर भाग्यवान् आणि धन्य होत. त्यांच्या आनंदस्थितीचें वर्णन करणें अशक्य आहे.

रामचंद्र आत्माराम तर्खड फार मोठे साईभक्त असून साईपदीं त्यांची अढळ निष्ठा असे. साई म्हणजे जणूं काय त्यांचें विश्रामधाम! सर्वजण त्यांना बाबासाहेब म्हणत. त्याच नांवानें आपण त्यांना संबोधूं या. तर्खड साई प्रेमानें उचंबळून येत. त्यांना प्राप्त झालेले अनुभव सांगतांना त्यांचें हृदय भरून येई. ते ऐकतांना फारच सुख वाटत असे. काय त्यांचें भक्तिवैभव! एकामागून एक अभिनव असे अनुभव त्यांना पदोपदीं मिळत. तेही हावभावयुक्त त्यांचें वर्णन करीत असत.

या प्रेमळ भक्तानें आपल्या घरीं चंदनी देव्हाऱ्यांत बाबांची एक मोठी तसबीर स्थापन केली होती व तिची त्रिकाळ पूजा होत असे. बाबासाहेब मोठे पुण्यवान् होते. त्यांच्यासारखाच भक्तीमान् पुत्र त्यांना लाभला होता. साईबाबांस नैवेद्य समर्पिल्या-शिवाय तो अन्नग्रहण करीत नसे. प्रातःकाळीं स्नान होतांच मनोभावानें त्यानें प्रतिमेचें पूजन करावें आणि भक्तीनें नैवेद्य दाखवावा. हा त्याचा नित्यक्रम अविश्रांत चालला असतां त्याला त्याच्या परिश्रमाचें फळ प्राप्त होऊन उत्तम अनुभवहि मिळूं लागले होते.

त्याची माताहि साईंची परमभक्त होती. शिरडीस जावें, समर्थांचें दर्शन घ्यावें व तेथेंच त्यांची चरणसेवा करीत कांहीं दिवस राहावें असें तिच्या मनांत आलें. मुलानें तिच्याबरोबर जावें ही बाबासाहेबांची इच्छा. मुलाच्या मनांत जावयाचें नव्हतें; कारण आपल्या

मागें बाबांची पूजा कशी होईल ह्याच त्याला चिंता वाटत होती. वडील पडले प्रार्थना समाजिस्ट; तेव्हां त्यांना मूर्तिपूजेचे कष्ट कसे द्यावे ह्याचेंच त्याला कोडें पडलें होतें. "साईंना नैवेद्य दाखविल्याशिवाय घरांत कोणीही अन्नग्रहण करूं नये" अशी त्यानें विनंति केली व हें मान्य असल्यास आपण आईबरोबर शिरडीस जाऊं असें त्यानें कळकळीनें आणि विनयपूर्वक वडिलांस सांगितलें. 'जा मी दररोज करीन नैवेद्य, तूं निश्चित रहा. साईंना समर्पिल्याशिवाय आम्ही कोणीही अन्नग्रहण करणार नाहीं हें माझें वचन मान व तूं स्वस्थपणें आईबरोबर जा.' असें वडिलांकडून आश्वासन मिळतांच मुलगा आईबरोबर शिर्डीस निघून गेला.

दुसऱ्या दिवशीं पूजेच्या अगोदर बाबांच्या प्रतिमेसमोर उभें राहून तर्खडांनीं साष्टांग लोटांगण घातलें आणि म्हटलें, "बाबा, मुलगा जशी आपली पूजा करीत असे तशीच मजकडून सेवा करून घ्यावी. माझ्या हातून पूजेची कवाईत न घडो. माझ्या अंतरीं प्रेम आणि भक्ति असूं द्या." ह्याप्रमाणें तर्खड दररोज सकाळीं लवकरच स्नान वगैरे आटपून भक्तीनें बाबांची पूजा करीत आणि साखरेचा नैवेद्य त्यांना दाखवीत. कामाच्या गर्दीत एक दिवस बाबासाहेब नैवेद्य दाखविण्यास विसरले आणि नैवेद्य न करतांच सर्वांचीं जेवणें उरकलीं. तर्खड एका गिरणींत मुख्याधिकारी होते व सकाळीं लवकरच त्यांना नोकरीवर जावें लागत असे. दुपारीं जेवावयास आले म्हणजे स्वैंपाकीण प्रसादाची साखर त्यांच्या पात्रांत ठेवीत असे. हीच ती अन्नशुद्धि जाणावी. त्या दिवशीं साखरेची वाटी ताटांत दिसली नाहीं तेव्हां तर्खडांना फारच वाईट वाटलें व त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले. पश्चात्ताप अंतःकरणानें ताटावरूनच बाबांच्या प्रतिमेकडून पाहून ते म्हणाले, "बाबा, काय ही माया मला दाखविली? भूल पाडून कशी कवाईत करवून घेतलीत मजकडून? क्षमा करा बाबा. ही भूल, नव्हे हें महापाप होय. बाबा मी चुकलों. मजवर कृपा करावी." असें म्हणून प्रतिमेसमोर त्यांनीं साष्टांग लोटांगण घातलें आणि गहिंवरून अंतःकरणापासून बाबांची करुणा भाकली. मग त्यांनीं सविस्तर हकीकतीचें मुलास पत्र पाठवून या थोर अपराधाबद्दल बाबांकडे क्षमा मागण्यासाठीं लिहिलें. साईंची करुणा भाकून मी शरण आलों आहें, मजवर दया करावी अशी विनवणी करण्यास त्यांनीं सांगितलें.

वांद्र्याला हें घडत आहे तोंच शंभर कोस दूर असलेल्या शिरडींत ही खबर ताबडतोब मिळालीच, याबद्दलचे बाबांचे उद्गार ऐका. भुत, भविष्य व वर्तमान, तसेंच देशकालाच्याही पलिकडील महाराजांच्या त्रिकालज्ञानाचा प्रत्यक्ष पुरावा पहा. इकडे शिरडींत तर्खडांचा मुलगा त्याचवेळीं बाबांस वंदन करण्यास गेला असतां काय घडले तें सावधान चित्तानें ऐका. आईसमवेत मोठ्या उत्साहानें बाबांची चरणसेवा करीत असतांना बाबा आईस काय म्हणाले, तें ऐकतांच विस्मय वाटल्यावांचून राहाणार नाहीं. 'काय करावें आई, रोजच्यासारखा मी आज वांद्र्यास गेलों, परंतु पेज वगैरे कांहींच प्यावयास न मिळतां उपाशींच परत यावें लागलें. पहा कसा ऋणानुबंध आहे तो. दार बंद होतें; तरी स्वच्छंदानें मी आंत प्रवेश केला. मला कोणी अडवूं शकलें नाहीं. मालक घरीं मिळाला

नाहीं. आंतडीं कळवळून निघालीं आणि भर दुपारीं अन्नाशिवाय माघारीं परतावें लागलें." मुलानें हे बोल ऐकतांच तो तात्काळ समजून चुकला कीं आपले वडील नैवेद्य द्यावयास बहुतकरून विसरले असले पाहिजेत. त्यानें घरीं परत जाण्यासाठीं बाबांस परवानगी देण्यास विनंति केली. बाबांनीं त्यास जाऊं न देतां तेथेंच त्याजकडून सेवा घेऊं लागले. शिरडीहून आलेलें सविस्तर पत्र वाचून पाहतां वडिलांचें अंतःकरण विरघळून गेलें, त्याचप्रमाणें मुंबईचें पत्र वाचून मुलांच्याहि नेत्रांतून अश्रु वाहूं लागले. हा पहा साईचा कसा खेळ असतो! असा कोण पाषाणहृदयी मनुष्य असेल की त्याचें हृदय भक्तीनें आणि प्रेमानें उचंबळून येणार नाहीं?

अशीच एकदां या मुलाची आई शिरडीस असतां साईनीं तिच्यावर अनुग्रह केला या बद्दलची नवल कथा ऐका. माध्यान्हीची वेळ होती. भोजनाची तयारी होऊन स्वयंपाक घरांत पात्रें वाढलीं होतीं. इतक्यांत दारांत एक भुकेलें कुत्रें येऊन उभें राहिलें. पुढें चिखलांत एक भुकेलेला सूकर बसला होता. बाईनें पात्रांतील भाकरी उचलून एक एक चतकोर त्यांना घातला. ही गोष्ट स्वाभाविकपणें घडून आली. ती बाईच्या लक्षांत सुद्धां राहिली नाहीं. नित्यक्रमानुसार भोजनोत्तर मशिदींत बाई साईच्या दर्शनास गेल्या असतां बाबा कसें म्हणतात, आई मला तूं आज जेऊं घातलेस म्हणून माझें पोट आकंठ भरलें आहे. भुकेनें माझे प्राण व्याकुळ झाले होते, तूं माझी तृप्ति केलीस. असेंच नेहमीं करावें. हेंच पुढें उपयोगी पडणार आहे. मी मशिदींत बसून असत्य भाषण करीन, असें कधींच घडणार नाहीं.

साईसमर्थ काय म्हणाले याबद्दल बाईस कांहींच उमज पडेना. बाबा निरर्थक कांहींच बोलणार नाहींत. यांत कांहीं तरी भावार्थ असला पाहिजे. बाई म्हणतात, "मी तुम्हांस वाढावें हें घडणार तरी कसें? मी परतंत्र पैसे देऊन मिळेल तें खातें."

" बाबा प्रत्युत्तर करतात, "तुझी ती प्रेमाची भाकर खाऊन मी अत्यंत तृप्त झालों आहें. अजून मला ढेंकर येत आहेत. तूं जेवावयास बसतांना दारांत भुकेला कुत्रा आणि क्षुधातुर सूकर नव्हता का आला? तीं माझींच रूपें होतीं!"

बाबांचें हें म्हणणें ऐकून बाईला आश्चर्य वाटलें. कुत्रीं मांजरीं वावरतात तीं म्हणजे बाबाच कीं काय?"

"कधीं मी श्वान, कधीं सूकर, तर कधीं गाई, मांजर, माशी, जलचर अशा रूपांत मी वावरतों. भूतमात्रांत जो मला पाहतो तो माझा आवडता हें तूं लक्षांत ठेव. करितां तूं भेदबुद्धि त्यजून माझें भजन कर." हें ऐकतांच बाईचा कंठ सद्गदित होऊन तिच्या नेत्रांतून अश्रु ओघळूं लागले.

या बाईची समर्थ साईच्या भक्तिभावाची आणि एकात्मतेची खूण पटवून देणारी आणखी एक सुंदर कथा ऐका. एकदां बाबांचे भक्त पुरंदरे सहकुटुंब शिरडीस निघतेवेळीं बाईनीं त्यांच्याकडे दोन वांगीं देऊन एकाचें भरीत व एकाचीं भजीं करून बाबांना भरपूर वाढण्यास त्यांनीं पुरंदरेबाईंना विनंति केली. आरतीनंतर भोजनाचे वेळीं पुरंदरे बाई भरीत घेऊन गेल्या. नित्यनियमाप्रमाणें नैवेद्य दाखवून ताट तेथेंच ठेवून त्या निघून

गेल्या. सर्वांचे नैवेद्य घेऊन बाबा भोजनास बसले. भरीताची चव घेतांच त्यांना तें रुचकर लागलें. तें आवडीनें घेऊन समस्तांना वाटलेंही. मग भर्जी खाण्याची इच्छा त्यांनीं दर्शविली आणि तीं आणावयास सांगितली. राधाकृष्णाबाईंना निरोप गेला. बाबा जेवावयाचे खोळंबळे असून, वांग्याच्या काचऱ्या खाण्याची त्यांना इच्छा झाली आहे. काय करावें समजत नाहीं. वांग्यांचा हंगाम नसल्यानें हा पदार्थ होणार कसा? भरिताचा आणि पुरंदरेबाईंचा शोध सुरू झाला. त्याच्या नैवेद्यांत भरीत असल्यामुळें आणखीहि वांगीं त्यांच्याकडे असतील असें वाटलें. तिला विचारतांच काचऱ्यांची अन्वर्थता आणि त्याबद्दल बाबांचें एवढें प्रेम कां हें सर्वांना कळून चुकलें. बाई म्हणाल्या, "एकाचें भरीत करून दुपारीं अर्पण केलें आणि मागाहून काचऱ्या नेईन म्हणून दुसरें वांगें चिरून ठेवलें आहे." ही वांग्यांची कथा हळूहळू सर्वांना समजली आणि साईंची व्यापकता पाहून जो तो मनांत आश्चर्य करूं लागला.

१९१५ च्या डिसेंबरांत या बाईंनीं अतिशय प्रेमानें बाबांकरितां एक पेढा पाठविला. बाळकराम मानकर परलोकवासी झाल्यावर त्यांच्या क्रियाकर्मांतराबाबत विचारण्यासाठीं त्याचा मुलगा शिरडीस येण्याकरितां निघाला. बाबांकडे जात आहे म्हणून तो बाईंना सांगावयास आला. त्याच्याबरोबर बाबांसाठीं कांहींतरी द्यावें असें बाईंच्या मनांत आलें. त्यांच्या मुलाला बाहेर जाण्याची घाई होती आणि नैवेद्य दाखविलेल्या पेढ्यावाचून त्यांच्या जवळ दुसरें कांहींच नव्हतें. जाणारा सुतकी आणि उच्छिष्ट पेढा पण तोच साई आवडीनें खातील म्हणून प्रेमपुरःसर त्यांना द्यावयास बाईंनीं सांगितलें. ह्या मुलाचें नांव होतें गोविंदजी. शिरडीस गेल्यावर पेढा बिऱ्हाडीं विसरून गोविंदजी तसाच दर्शनास गेला. त्यावेळीं बाबांनीं धीर धरला. तिसरें प्रहरीं तो पुन्हा पेढा विसरून रिक्तहस्तानें मशिदींत जातांच बाबांनीं त्याला विचारले, "तूं माझ्यासाठीं कांहीं आणलें आहेस कां?" गोविंदजींनी नाहीं म्हणून उत्तर दिलें.

साईंनीं मग स्पष्टच विचारलें, 'अरे, घराहून निघतेवेळीं आईनें मोठ्या प्रेमानें माझ्यासाठीं तुझ्याजवळ खाऊ दिला आहे ना?'

तेव्हां मग त्याला आठवण झाली. विस्मरण पडलें म्हणून लज्जायमान झाला. बाबांची क्षमा मागून नमस्कार करून तो निघून गेला. धांवत जाऊन बिऱ्हाडांतून पेढा आणून बाबांना दिला. हातीं पडतांच खाऊन बाबांनीं आईचा भाव पूर्ण केला.

असा हा साईंचा महानुभाव आहे. ज्याच्या मनीं जसा भाव तसा त्याला अनुभव देऊन ते भक्त गौरव वाढवतात. 'सर्वां भूतीं भगवंत' हा सकलशास्त्र संमत सिद्धांत या कथांचें इंगीत आहे. पुढील अध्याय ऐकतांच बाबांची रहाणी आपणांस कळून येईल आणि ते कोठें निजत असत ते सावचित्तपणीं ऐका. हेमाड साईपदीं शरण आहे. झालेल्या कथांचे आदरानें निदिध्यासन व मनन केल्यास श्रोतेहो! तुम्ही कृतकल्याण पावाल.

अशा रीतीनें श्रीसंतजनांनीं प्रेरित केलेला आणि हेमाडपंतांनीं रचलेल्या श्रीसाईसमर्थ सच्चरिताचा नववा अध्याय संपूर्ण झाला.

॥ श्री सद्‌गुरु साईनाथार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥

# नामस्मरणाचें महत्व

**या जगांत भगवन्नामासारखें जीवन सार्थकीं लावणारें दुसरें खात्रीलायक साधन नाहीं. आणि हा मार्ग किती सोपा, सहज-साध्य व सहज आचरणांत आणण्यासारखा आहे बरें! परंतु त्याकडे डोळेझांक करून आपण वायफळ बडबड, वादविवाद व काथ्याकूट करण्यांत रोजच्या आयुष्याचा कितीतरी वेळ व्यर्थ दवडीत आहोंत!**

## स्वतःची फसवणूक

या कलियुगांत सर्व लोकांसाठीं कल्याणाचा जर कोणता खात्रीचा मार्ग असेल तर तो म्हणजे भगवंताचें नामस्मरण हाच होय. सर्व साधूसंतांनीं या मार्गाचें महत्त्व परोपरीनें गायिलें आहे; परंतु आमचें त्या सांगण्याकडे कुठें आहे लक्ष! आम्हीं नाना प्रकारचीं कारणें पुढें आणीत असतों. त्यांतील मुख्य कारण म्हणजे वेळ कुठें आहे? परंतु हें कारण सर्वस्वीं पोकळ व फसवणूक करणारें आहे. स्वतःची फसवणूक व इतरेजनांचीहि फसवणूक! वेळ नाहीं ही सबब किती पोकळ आहे बरें! नाचायला येत नाहीं म्हणून आंगण वांकडं! त्यांतलीच गोष्ट आहे ही! मनुष्याला कामधाम करावयाचें असतें. परंतु खरोखर महत्त्वाचें व करणें अत्यावश्यक असें कामधाम त्यामध्यें किती बरें असतें? महत्त्वाचें असें काम आपण मनांत आणलें तर फार थोडक्या वेळांत पार पाडूं शकतों. परंतु रेंगाळत रहाण्याची संवयच पडली आहे आम्हांला! अनावश्यक अशी कितीतरी कामें आम्ही आपल्या मागें लावून घेत असतों व त्यांत आपला वेळ व्यर्थ दवडीत असतों. तीं अनावश्यक कामें सोडून देऊन तो वेळ आपल्या कल्याणाच्या अशा भगवन्नामाकडे लाविला तर तें योग्य होणार नाहीं का? परंतु आपण भलत्या सलत्या सवयी स्वतःला लावून घेतल्या आहेत, त्यांच्या तावडींतून आम्हीं आपली सुटका करून घेतली पाहिजे.

आपण व्यर्थ बडबड करण्यांत व वायफळ बोलण्यांत रोज किती बरें वेळ व्यर्थ दवडीत असतों! त्या वेळांत जिभेनें रामनाम घेतलें तर काय बरें बिघडेल? काम करा ना; हातानीं काम करायचें व जिभेनें नाम घ्यावयाचें! त्यांत काय बिघडलें? उगाच बडबड करण्यांत वेळ कां बरें दवडावयाचा? परंतु आपण तो दवडीत असतोंच कीं नाहीं? दुसऱ्यांची निंदा करण्यांत, खोटेंनाटें बोलण्यांत व अन्यथा जरूर नसलेलें असें बोलणें रोजच्या रोज आपल्याकडून किती बरें होत असतें!

## भगवन्नामामुळें फायदे

रामनामानें किती फायदे होतात याची आपणास कल्पनाहि नसेल. कशी असेल? कधीं त्याचा विचारच केला नाहीं तर कल्पना कशी होणार? त्यामुळें पापांचा मळ मनांतून नाहींसा होतो. अंतःकरण शुद्ध होतें; आणि त्या शुद्धतेची तर आपणास अत्यंत जरूरी आहे. चर्चा, वादविवाद व निंदा करण्यांत जीभ विटाळून आपण अंतःकरणांत पापांचे थरांवर थर रचीत असतों.

यासाठीं आपण असा निग्रहपूर्वक नियम केला पाहिजे कीं, सकाळीं उठल्यापासून तो रात्रीं बिछान्यावर पडून झोपी जाईपर्यंत, जरूर, अगदीं बोललेंच पाहिजे, तेवढेंच बोलावयाचें; वायफळ बोलण्यांत एक क्षणही न दवडतां तो वेळ भगवंताचें नामस्मरण करण्यांत खर्च करावयाचा, अभ्यासानें दैनंदिन सवयीनें, सर्व कांहीं शक्य होतें. निर्धार पाहिजे, अभ्यास ठेवला पाहिजे, संवय केली पाहिजे. आपोआप तुमच्यांत थारेपालट घडून येईल. आणि या नियमाचें इमानें इतबारें पालन तुम्हीं ज्या प्रमाणांत कराल त्या प्रमाणांत तुम्हीं भगवंताच्या जवळपास जाऊं शकल, आणि तेवढें तुमचें जीवन सफल होऊं लागेल.

## बंधन नाहीं, आडकाठी नाहीं.

भगवंताचें नांव घेण्यासंबंधीं कांही नियम नाहींत, बंधनें नाहींत, आडकाठी नाहीं, कांहीं नाहीं. तें नांव लहानांनीं घ्यावें, मोठ्यांनीं घ्यावें, पुरुषांनीं घ्यावें, स्त्रियांनीं घ्यावें, पाप्यांनीं, पुण्यवंतांनीं, कोणी वाटेल त्यांनीं घ्यावें. त्याला वेळ-काळ कांहीं ठरलेला नाहीं. केव्हांही व कुठेंही त्या नांवाचा जप करावा.


**MATUNGA CLEANING WORKS**

ESTD. 1934 — *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

**A Pleasure to You—A Satisfaction to Us**

**Chemical Cleaners, Super Fine Darners**

**Master Dyers**

*FOR*

**Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths**

**सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार**

**माटुंगा क्लीनिंग वर्क्स**

**स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ (मालक : एस. व्ही. प्रधान**

तें नांव कोणतें घ्यायचें ? जें तुमच्या आवडीचें असेल, ज्याच्यावर तुमचा भक्तिभाव जडला असेल, तें नांव आवडीनें घ्या. साईबाबांचें नांव घ्या, रामचंद्राचें घ्या, कृष्णाचें घ्या, शंकराचें घ्या, जें मनापासून आवडतें तें नांव घ्या. त्याच्याशीं तन्मय व्हा.

**व्यवसाय कोणताही असो**

तुम्हीं कोणत्याही कामांत असा. तुमच्या व्यवसाय वकिलीचा, डॉक्टरीचा, न्यायदानाचा, विक्री–खरेदी करण्याचा लिहिण्याचा किंवा हातानें कोणतेंही काम करण्याचा असो. तो नामस्मरणाच्या आड येऊं शकत नाहीं. नामजप मनांतल्या मनांत करायचा असतो. तो केव्हांही वाटेल त्या व्यवसायांतील माणसाला करतां येतो. श्रद्धा मात्र संपूर्ण पाहिजे. तुम्हीं विद्यार्थी असलां तर शाळा कॉलेजांत जातां येतांही हरिनाम, साईनाम जपूं शकाल.

तुम्हीं शेतकरी असा, कामकरी असा, कोणीहि असा. भगवन्नाम हाच इतरांप्रमाणें तुमच्याही कल्याणाचा मार्ग आहे. रस्त्यानें जातां येतां, काम करतां करतां, तुम्हीं भगवन्नाम घेऊं शकतां. जपूं शकतां.

पुरुषांप्रमाणें स्त्रियाही कोणत्याही कामांत असोत. स्वयंपाकांत गुंतलेल्या असोत विहिरीवर पाणी भरीत असोत. दळण दळीत असोत किंवा कांडीत, कुटीत असोत. भगवन्नामामुळें त्यांच्या कामाकाजांत व्यत्यय मुळींच न येतां उलट त्यामुळें तुमच्या कामांत त्याची मदतच होईल.

**इतरांनाही ती दीक्षा द्यावी**

देवाचें, आपल्या उपास्यदेवतेचें नामस्मरण दिवसांतून जितक्या वेळां करतां येईल तितक्या वेळां करावें. एवढेंच नव्हे, तर हा कल्याणाचा मार्ग स्वतः आचरणांत आणून इतरांकडूनही त्याचें आचरण घडवावें. हें एक महान् पुण्यकारक कार्य आहे. तुम्हांला जें जें कांहीं हवें असेल तें तें भगवन्नाम श्रद्धापूर्वक व सतत घेत राहिल्यानें मिळणार आहे, याची पूर्ण खात्री बाळगा. तुमच्या उद्धारासाठीं भगवन्नामासारखें दुसरें साधन नाहीं याची खात्री बाळगा.

म्हटलें आहे कीं,

**ते सभाग्या मनुष्येषु कृतार्थानृप निश्चितम् ।**
**स्मरन्ति ये स्मारयन्ति हरेनाम कलौ युगे ॥**

सध्यांच्या या कलियुगांत जे कोणी भगवंताचें नामस्मरण श्रद्धापूर्वक करतात व इतरेजनांकडून करवितात ते खरोखर कृतार्थ व धन्य होत.



# विचार व आचार शुद्धि

**आम्हीं बाह्यांगाच्या शुद्धतेकडे लक्ष देतों. अंतरंग कितीही गलिच्छ विचारांनीं बरबटलेलें असेना का, आम्हांला त्याचा विधिनिषेध कांहीं नाहीं. तुमचें अंतरंग मानवी डोळ्यांना नाहीं दिसत तरी भगवंताला तें आरपार दिसतें. तेथें कांहीं लपवाछपवी चालत नाहीं. तो तुमचें मोजमाप अंतरंग शुद्धीवरूनच करीत असतो.**

उत्तम व सुगंधी साबण अंगाला चोळून स्नान केलें, तसेंच स्वच्छ, शुभ्र कपडे परिधान केले म्हणजे आपण शुद्ध झालों असें थोडेंच आहे? ही झाली बाह्यशुद्धि. अंतरंगांतील शुद्धीचें काय? अंतरंग नानाप्रकारच्या पापी व दुष्ट विचारांनीं ओतप्रोत भरलेलें असेल तर त्या बाह्यशुद्धीचा व त्या सुंदर देखाव्याचा कांहींतरी उपयोग आहे का? आपलें बाह्यांग निर्मळ पाहिजे. त्याहीपेक्षां आपलें अंतरंग निर्मळ असण्याचें भारी महत्त्व आहे. तेंच तर सर्वांत महत्वाचें व आमच्या कल्याणास कारण होणारें आहे. परंतु आजकाल आपण सारा भर देत आहोंत बाह्योपचारावर. आपल्या शरिराच्या अंतरंगांत दुष्टपणाचे खोटेनाटे, पापी विचार कितीहि धुडगूस घालीत असेनात का, त्यांचें आपणास कांहीं वाटत नाहीं.

## अंतर्बाह्य शुद्धता

आपल्या मनांत कोणत्याहि प्रकारचा संशय शिल्लक रहातां कामा नये. संशय नको, दुष्टता नको, पापाचा मळ नको, कांहीं नको. अंतरबाह्य सारें निर्मळ पाहिजे. शुद्ध आचार व शुद्ध विचार, हें आपले नेहमींचे सहकारी होऊन राहिलें पाहिजेत. आपण पवित्र व दुसरे अपवित्र; आपली जात शुद्ध व दुसऱ्या जाती अपवित्र व अशुद्ध ही भेदभावाची भावना आपण मनांतून काढून टाकिली पाहिजे. आपलें वर्तन सर्वांशी सारखें असलें पाहिजे. सारीं ईश्वराची लेकरें. उच्चनीच कोणी नाहीं. कोणाहिबद्दल दुष्ट भावना किंवा उच्चनीचतेचे विचार अंतःकरणांत येतां कामा नयेत.

आज जग विचारी बनत चाललें आहे. बरें वाईट समजूं लागलें आहे; तरी हें समजत असूनहि किती तरी गोष्टी आपणास उमजत नाहींत. आपण जाणूनबुजून त्यांच्याकडे दुर्लक्ष करतों. एकनाथ कितीतरी वर्षांपूर्वी होऊन गेले. ते खरे भगवद्भक्त व थोर संत होते. तत्कालीन लोकांनीं, ब्राह्मणांनीं, अहंकारास पेटून अज्ञानामुळें व अविचारामुळें त्यांचा थोडाथोडका का छळ केला? परंतु तो महात्मा केव्हांहि चिडला नाहीं. चडफडला नाहीं.

## एकनाथा घरीं श्राद्ध

एकदां एकनाथांच्या घरीं त्यांच्या वडिलांचें श्राद्ध होतें. सर्व गोष्टी ते यथान्याय यथासमय योग्यप्रकारें पार पाडीत असत. श्राद्धाचा दिवस. गांवांतील सार्‍या ब्राह्मणांस भोजनाचें आमंत्रण होतें. वाड्यांत श्राद्धानिमित्त नाना प्रकारचीं पक्वान्नें तयार होत होतीं. त्यांचा सुगंध बाहेर सर्वत्र दरवळला होता. वाड्याजवळून कांहीं हरिजन गप्पागोष्टी करीत जात होते. त्यांना पक्वान्नांचा सुगंध आल्याशिवाय कसा राहील ? तो मोठा मोहक व तोंडाला पाणी सोडणारा सुगंध होता. गरीब बिचारे हरिजन ! जातां जातां तो सुगंध घेण्यापलिकडे त्यांच्या वांट्यास आणखी-दुसरें काय यावयाचें ?

त्यांपैकीं एकजण म्हणाला, 'काय हो ! मधुर सुगंध दरवळला आहे ? प्रत्यक्ष पक्वान्नें किती मधुर असतील नाहीं ?'

## आपण हरिजन !

दुसरा म्हणाला 'होय गड्या ! सारें खरें; तुम्हां आम्हांला काय बरें त्यांचा उपयोग ? त्या पक्वान्नांचे मालक या गांवांतील भटभिक्षुक-ब्राह्मणलोक ! आम्हांला कोण विचारीत आहे. ते खरोखर भाग्यवान् ! देवानें तें भाग्य आमच्या नशिबीं कुठें लिहिलें आहे ?

एकनाथ महाराजांच्या कानीं त्यांचें तें बोलणें ओझरतें पडल्याशिवाय राहिलें नाहीं. मग काय ? सर्व भूतमात्रांकडे समदृष्टीनें पहाणारे एकनाथच ते ! तावडतोब उठले व हांका मारून त्यांनीं त्या हरिजनबंधूंना आग्रहपूर्वक बोलाविलें व घरांत तयार झालेलीं नाना प्रकारचीं पक्वान्नें त्यांच्याकडून चाखविलीं. त्यांना पोटभर वाढायला लाविलें, त्यांच्या आत्म्यास संपूर्णपणें संतुष्ट कराविलें. जो आत्मा माझ्याठायीं वास करीत आहे तोच त्यांच्या ठायींही आहे असें मानणारे एकनाथ ! त्यांना हात हालवीत थोडेच जाऊं देणार ! त्यांचें पूर्ण समाधान करून त्यांना पाठविलें. किती आनंदानें व समाधानानें त्यांनीं निरोप घेतला एकनाथजींचा ! आणि एकनाथांनाही त्यामुळें केवढी कृतार्थता वाटली !

## ब्रह्मवृंद रागावला

परंतु ! परंतु काय ? गांवांतील ब्राह्मण एकनाथावर रुष्ट झाले. ते त्यांच्यावर कडाडले ! संतापले व रुसले ! आम्हांला भोजन वाढण्याऐवजीं हरिजनांस भोजन घातलें हा का न्याय झाला ? हा झाला अन्यायाचा कळस ! आम्हीं ब्रह्मवृंद हा अपमान केव्हांही सहन करणार नाहीं असें म्हणून ब्राह्मणांनीं एकनाथांच्या वाड्याच्या दरवाजावर सत्याग्रह सुरू केला !

कसला सत्याग्रह ? एकाहि ब्राह्मणाला वाड्यांत भोजनासाठीं जाऊं द्यावयाचें नाहीं व एकनाथाची जिरवायची असा घाट त्यांनीं घातला.

त्यांना एकनाथ हात जोडून म्हणाले, " महाराज! कृपा करा! तुमच्या सोयीसाठीं पुन्हां दुसरें खास भोजन तयार करविलें आहे. आपण आढेवेढे न घेतां उठावें व भोजनाचा लाभ घ्यावा."

परंतु ते कुठचें ऐकायाला ? त्यांनीं आपला सत्याग्रह जोरांत चालू ठेविला. एकाही ब्राह्मणास आंत प्रवेश करूं दिला नाहीं.

## भगवंत सहकारी

अरेरे ! केवढें त्यांचें अज्ञान व काय हा अहंकार ! नम्र झाला भूतां ! तेणें कोंडिलें अनंता ! ! जो सर्व भूतमात्रांकडे समदृष्टीनें पाहतो, त्याचा सहाय्यकारी भगवंत असावयाचा. एकनाथाची पर्वा त्या अहंकारी व अधिकारी ब्राह्मणांनीं नाहीं केली तरी भगवंताला आपल्या भक्ताची काळजी असावयाचीच. त्या पंचपक्वान्नांच्या लाभ घेण्याचें त्या ब्राह्मणांच्या नशिबीं नव्हतें, त्याला ते तरी काय करणार ?

परंतु भगवंताच्या अनुज्ञेनुरूप एकनाथाचे सारे पितर प्रत्यक्ष भोजन करण्यासाठीं पाटावर येऊन बसले व संतुष्ट मनानें भोजन करून एकनाथास आशीर्वाद देते झाले. "हरहर महादेव" असा घोष आंतून ऐकूं आला. ब्राह्मण तो घोष ऐकून आश्चर्यचकित झाले. त्यांचा बेत फसला व त्यांना एकनाथांची योग्यता समजून आली.

एकंदरींत काय ? आपले आचार, विचार निर्मळ असले पाहिजेत. त्यांत सरलता व समानता असावी. कोणत्याहि बाबतींत दुजाभाव असूं नये. विचारशुद्धि व आचारशुद्धी हीं आपण दोन्हीं कटाक्षपूर्वक पाळलीं पाहिजेत.

एकनाथांच्या किंवा इतर साधुसंतांच्या कथा वाचून किंवा ऐकून काय उपयोग ? त्यांचा आदर्श सतत दृष्टीसमोर ठेऊन आपण वागलों, तरच जन्मा आलियाचें सार्थक.

---

दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :— DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन्स (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून
उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

छबिलदास रोड, दादर (W. R.), मुंबई २८

# स्मरावी मूर्ति बाबांची

साईबाबांची । स्मरावी । मूर्त मनीं साची ॥ ध्रु० ॥
भाग्य विधाते दीन जनांचे
संत श्रेष्ठ जे मानवतेचे
चरण कमल ते पवित्र त्यांचे
साक्ष ईश्वराची । स्मरावी । मूर्ती बाबांची ॥ १ ॥
संत पुरातन शिरडीचे ते
साईबाबा, अमुचे होते !
भक्त गणांचे प्रेम वहाते
श्रद्धा सर्वांची । स्मरावी । मूर्त मनी त्यांची ॥ २ ॥
देवाचें अस्तित्व जगाला
पटवुन द्याया अघटित लीला
बाबांनीं दाविली अम्हांला !
भक्ती भावाची । स्मरावी । मूर्ती बाबांची ॥ ३ ॥
भक्तांचा दृढभाव पाहुनी
संकटकालीं जात धावुनी
कृत पापांचें क्षालन करूनी
धारा अश्रूंची । वहावी । प्रेमभरें साची ॥ ४ ॥
बाबांचा उपदेश आठवा
अंतर्यामी प्रेम सांठवा !
देवावरती श्रद्धा ठेवा
शिकवण ही ज्यांची । स्मरावी । मूर्ती बाबांची ॥५॥
भक्तांच्या भक्तीस भुकेले
जननिंदेला नाहीं भ्याले
प्रेमरसाचे प्राशुन प्याले
मुक्ती मार्गाची । स्मरावी । मूर्त मनी त्यांची ॥ ६ ॥

—श्री. बा. मा. हराळे, साहित्यप्राज्ञ

पांच व अभिप्राय—

# ' भगवान् श्रीनित्यानंद '

****************************

( भगवान् श्री. नित्यानंद—निवेदक व प्रकाशक—**बाबुराव अर्नाळकर,** अभ्यंकर बिल्डिंग, स्लेटर रोड, ग्रँटरोड मुंबई ७, किं. ३ रु. )

सुप्रसिद्ध रहस्यकथा लेखक श्री. बाबुराव अर्नाळकर यांनी वज्रेश्वरी–गणेश पुरी–येथें वास्तव्य करणारें सत्पुरुष श्री. नित्यानंद यांचे हें त्रोटक चरित्र अत्यंत भक्तिभाव-पूर्वक लिहिलें आहे. मुंबईचे राज्यपाल श्री प्रकाश यांनीं त्याला प्रस्तावना लिहिली असून महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष श्री. स. ल. सिलम यांनीं पुरस्कार व श्रीनित्यानंद महाराजांचे शिष्य स्वामी मुक्तानंद यांनीं आशीर्वादपर चार शब्द लिहिले आहेत.



चरित्र लेखक श्री. बाबुराव अर्नाळकर यांची श्रीसाईबाबांवर जशी अनन्य श्रद्धा आहे, तशीच ती श्री नित्यानंद यांच्यावरही आहे. त्यांचें नक्की जन्मगांव, साल किंवा त्यांचे वाडवडील यांची आज कोणालाही निश्चित माहिती नाहीं. श्रीसाईबाबा शिरडींत आढळून आले,त्याचप्रमाणें श्रीनित्यानंदजी हे कोईमातूर येथें प्रथम दृष्टीस पडले. त्यांनीं भारतभर व भारताबाहेरही अनेक वर्षें प्रवासांत घालविलीं. वज्रेश्वरीस येण्यापूर्वी त्यांनीं मंगळूर प्रांतांत संचार करीत असतां लोककल्याणार्थ नानाप्रकारचे चमत्कार केले. दक्षिण कानडामध्यें कांचनगड येथें वास्तव्य करून तेथें आश्रम स्थापन केला व इतर लोकोपयोगी बांधकामेंही अनेक केलीं. ते कोणत्याही एका जागीं कधींच स्थिरावले नाहींत. त्यानंतर अनेक गांवांतून त्यांनीं वास्तव्य केलें. ते जेथें जेथें गेले तेथें तेथें लोकांच्या कल्याणासाठीं व जनतेचीं दुःखें दूर करण्यासाठीं झटले. त्यांनीं कोणाहीकडून पैसा न घेतां अनेक ठिकाणीं अनेक लोकोपयोगी बांधकामें उभारलीं. मुलांबाळांवर त्यांचें आत्यंतिक प्रेम. त्यांना जेऊंखाऊं घालणें हा त्यांचा एक आवडता छंद आहे. रोज हजारों मुलांना जेवण द्यावयाचें हा त्यांचा क्रम आजहि गणेश पुरींत चालू आहे. पैशांची जरूरी लागली असतां जरूर तेवढी रक्कम आपल्या अंगावरील हिरव्या शालींतून किंवा एखाद्या दगडाखालीं हात घालून ते काढून देत असत. अशा प्रकारच्या अनेक चमत्कारांची नोंद लेखकानें या चरित्रांत घेतली आहे.

श्री नित्यानंदजी १९३३ सालीं मुंबईजवळील वज्रेश्वरी येथें आले व गेलीं सुमारें अठावीस वर्षें त्याच भागांत त्यांचें वास्तव्य आहे. वज्रेश्वरीची

गरम पाण्याच्या विविध झऱ्यांबद्दल फार ख्याति आहे. प्राचीन काळापासून तें स्थान महत्वाचें होऊन राहिलें आहे; परंतु अलिकडे गेलीं पंचवीस वर्षें स्वामी नित्यानंदजी यांच्या वास्तव्यामुळें त्या स्थान महात्म्यांत किती तरी भर पडली आहे. वज्रेश्वरीचा अभूतपूर्व कायापालट त्यांनीं घडवून आणिला आहे. स्वामीजी कोणाशीं बोलत नाहींत किंवा कोणाला उपदेशही करीत नाहींत. ते त्रिकालज्ञानी आहेत. भक्ताच्या मनांतील भाव ते ओळखतात. कोणी कांहीं दिलें असतां तें वाटून टाकण्यांत येतें किंवा त्याचा विनियोग इतेर जनांसाठीं व मुलांसाठीं केला जातो. वज्रेश्वरी गणेश-पुरी याठिकाणींही धर्मशाळा, मंदिरें व मुलांसाठीं शाळा, रस्ते वगैरे बांधून त्या भागां-तील जनतेच्या सुखसमाधानांत त्यांनीं भर घातली आहे.

अशा रीतीनें श्री नित्यानंदजींचे पट्टशिष्य स्वामी मुक्तानंद व त्यांच्या सहवासांत आलेल्या अनेकांकडून जितकी म्हणून माहिती मिळवितां येईल तेवढी मिळवून श्री. अर्नाळकर यांनीं अत्यंत सोप्या व आकर्षक भाषेंत या चरित्राची सजावट केली आहे. परंतु हें चरित्र त्रोटक व अपूर्ण आहे आणि याची जाणीव लेखकास पूर्णत्वानें आहे.

स्वामी नित्यानंदजी यांचे भक्त असंख्य व दूरवर पसरलेले. त्यांत गरीब श्रीमंत तसेच कलावंतही आहेत. त्यांचें दर्शन घेण्यासाठीं भेटीच्या ठराविक दिवशीं हजारों लोकांची दाटी गणेशपुरींत होत असते. श्रीनित्यानंदजी व श्री साईनाथ यांची तुलना करणारें व दोघांमधील कित्येक बाबतींतील साम्य दाखविणारेंही एक प्रकरण लेखकानें या चरित्रांत दिलें आहे.

श्री नित्यानंद हे सहसा कोणाशीं बोलत नाहींत; परंतु पूर्वी तुळसाम्मा या नांवाची एक भगिनी त्यांच्या सान्निध्यांत आली होती. तिची स्वामीजीवर अपरंपार श्रद्धा. तिनें श्रीमुखांतून वेळोवेळीं चालतां फिरतां बाहेर पडणाऱ्या शब्दांची नोंद करून ठेविली. तिची नोंद पोथी 'चिदाकाश गीता' या नांवानें इंग्रजींत व मराठींत प्रसिद्ध झाली असून तिच्या आधारें 'श्री गुरुदेवांची अमृतवाणी' हें प्रकरण, तसेंच पूर्वी साधकाला उपयोगी पडतील अशा प्रकारचीं त्यांचीं बोधवचनें त्यांचे पट्टशिष्य स्वामी मुक्तानंदजी यांनीं लिहून ( हिंदींत ) प्रसिद्ध केली आहेत, त्यावरून लिहिलेलें श्री गुरुदेवांचा आदेश हे प्रकरण. या दोन प्रकरणांवरून श्री नित्यानंदजींच्या तत्त्वज्ञानाचा व त्यांच्या शिकवणीचा कांहींसा बोध होऊं शकतो. आजवर होऊन गेलेल्या सत्पुरुषांप्रमाणेंच त्यांचीही शिकवण आहे.

एकंदरींत पहातां श्री नित्यानंदजी यांचें चरित्र व त्यांचें जीवन कार्य अद्‌भुतरम्य असून इतर साधुसंतांप्रमाणें जनता सन्मार्गी, सुखी व धर्मपरायण व्हावी यासाठींच आजवरचें त्यांचें सारें जीवन खर्ची पडलें आहे. प्रत्येक संताची वागण्यासवरण्याची तऱ्हा वेगवगळी असते, परंतु त्यांचें उद्दिष्ट मात्र एकच असतें. जनतेनें योग्य मार्गानें जाऊन आपलें शाश्वत कल्याण साधावें व त्या कार्यांत आपण शक्य त्या परीनें हातभार लावावा हीच त्यांची दृष्टि असते.

श्री बाबुराव अनाळकर यांनी आधुनिक काळांतील एका इयात संताच्या अज्ञात जीवनकार्यावर जितका म्हणून प्रकाश पाडतां येईल, तेवढा भक्तिभावपूर्वक व श्रद्धाळू अंतःकरणानें पाडलेला आहे, याबद्दल वाचकगण त्यांना धन्यवाद दिल्याशिवाय रहाणार नाहीं.

—:०:—

## संतसेवा माला

( **संतसेवा माला**–प्रकाशक–**रा. कृ. घोंगडे**, वाठार स्टेशन, जि. सातारा, पृष्ठें १२ ).

संतांच्या वचनांचा प्रसार करून त्याद्वारें धर्मप्रचार करावा या सद्धेतूनें श्री. घोंगडे यांनीं छोट्या छोट्या पुस्तिका प्रसिद्ध करून त्या मुमुक्षूजनांना मोफत वांटण्याचा स्तुत्य उपक्रम चालविला आहे. संतसेवा घरोघर पोहोंचती करण्याचें हें कार्य एकप्रकारें आर्थिक दृष्टया साहसाचें आहे; परंतु या विषयासंबंधीं श्री. घोंगडे यांची तळमळ दांडगी आहे. केवळ सेवाभावानें ते हें कार्य करीत आहेत. आतांपर्यंत दोन पुष्पें बाहेर पडलीं असून त्यांत ज्ञानदेव, नामदेव, कबीर, तुकाराम आदि संतांच्या निवडक व शुद्ध पाठाचे अभंग देण्यांत आले आहेत.

सत्यधर्माचा संतांच्या उक्तीच्याद्वारें प्रचार करण्याचा हा उद्देश स्तुत्य नाहीं असें कोण म्हणेल? धर्मो धारयते प्रजा :' जीवनांत धर्माचें स्थान फार महत्वाचें आहे. परंतु त्याच्याकडेच आजकाल दुर्लक्ष होऊं लागलें आहे. त्या दृष्टीनें मधून मधून धर्मविषयक एखादें प्रवचही देण्यांत येत असतें. अशा प्रयत्नांमागें पैशांचें पाठबळ असावें लागतें, परंतु तळमळ असली म्हणजे ईश्वर त्याचीही कुठून ना कुठून तरी जोड करून देतो. श्री. घोंगडे यांचा हा उपक्रम स्तुत्य आहे.

—:०:—

## सत्येंद्र गजानन

( **सत्येंद्र गजानन**–धर्मकार्यासाठीं हें त्रैमासिक गेल्या अक्षय्य तृतीयेपासून सुरू झालें आहे. संपादक—**श्री. रामकृष्ण गोविंद बोरकर.** वरकाणा भुवन, भवानीशंकर रोड, दादर, मुंबई २८; किरकोळ अंक २५ नये पैसे. )

श्रीगजानन महाराज शिष्य सांप्रदाय मंडळ व श्रीपाद श्रीवल्लभ मंडळ हीं दादर येथील दोन मंडळें गेल्या अनेक वर्षांपासून धर्मप्रचाराचें कार्य परोपरीनें करीत आहेत. श्रीपद्मनाथ शिष्य सांप्रदायाचें कार्य महशूर आहे. श्रीगजानन महाराज बोरकर हे त्या सांप्रदायाचे प्रमुख होते. गेल्या वर्षी ते इहलोक सोडून गेल्यानंतर त्यांच्या चिरंजिवानें व शिष्य सांप्रदायानें त्यांच्या कार्याची ज्योत सतत पेटती ठेविली आहे व सदर त्रैमासिक हा त्या कार्याचाच एक भाग आहे. मराठी न समजणाऱ्यांसाठीं इंग्रजी विभागही जोडण्यांत आला आहे. धर्मप्रचाराच्या या कार्यांत चालकांस आम्ही सुयश चिंतितों.

———




## मे १९६१

या महिन्यांत साईदर्शनासाठीं बाहेर गांवच्या भक्तांची सुटीमुळें बरीच गर्दी होत असे. याला कारण अधिक मास–त्यांत गुरुवारीं तर यात्रेसारखी गर्दी होत होती. अनेक कलाकारांनी श्री समोर हजेरी दिली. कार्यक्रम पुढीलप्रमाणें झाले:—

**कीर्तन:** श्री. ह. भ. प. सदाशिव केशव दसनूरकर (मनमाड) श्रीमती जानकीबाई इंगळे गोरेगांव, मुंबई नं. ६५, सं. गवई श्री. मराठे यांची नेहमींप्रमाणें एकादशीस कीर्तनें झालीं.

**प्रवचन:** श्री. टी. आर. त्रिपाटी, अहमदाबाद.

**गायन:** कु. शकुंतला पळसोकर (संगीत अलंकार) मु. अकोला (वऱ्हाड) कु. सुशिला मुजुंमदार मु. काजुबाद जि. कारवार, श्री. वसुंधरा विश्वनाथ श्रीखंडे परेल, मुंबई. श्री. ल. वा. पोफळकर (संगीत अलंकार) मु. अकोला वऱ्हाड. श्री. ए. जी. शेख, अहमदनगर सौ. प्रमोदिनी केकरे, मु. ग्वाल्हेर. श्री. बापू विष्णु मांद्रेकर, मुंबई. श्री. दत्तात्रय काशिनाथ मुळे, मु. बडोदा. (म्युझिक कॉलेज) श्री. गजानन पालखेडकर मु. बोर्डी जि. ठाणें. श्री. टी. आर. त्रिपाठी मु. अमदाबाद.

**दिलरुबा वादन:** श्री. भगवंत पांडुरंग वाघमारे, मु. बडोदा.

**सनई वादन:** श्री. नाथा गणपत साळुंके, फलटन, सनई वादन पार्टी.

**कव्वाली पार्टी:** श्री. जगदीश पटेल आणि कव्वाली पार्टी—मु. बडोदा.

**भजनी मंडळ:** पंचशील भजनी मंडळ धारणा प्रो. गोवर्धन धांदे. मु. धारणा जिल्हा–यवतमाळ (खंजिरी भजन).

**तबला सोलो वादन:** श्री. एकनाथ परशुराम पिंपळे मु. मालाड मुंबई.

**हार्मोनियम वादन:** श्री प्रभाकर बाबुराव जयकर, कांदिवली मुंबई ६७.

**अधिक** महिना व मे महिना दोन्ही एकत्र आल्यामुळें भक्तांची गर्दी बरीच झाल्यानें धर्मकृत्यें अभिषेक, पूजा अर्चन, महापूजा, साई सत्यनारायण वगैरे विशेष मोठ्या प्रमाणांत झाले.

**शिर्डी येथील हवापाणी:**–हवेंत उकाडा असून पाऊस विशेष नाहीं. पाण्याची टंचाई अद्याप आहे. परंतु संस्थानतर्फे इलेक्ट्रिक पंप बसवून मंदिरासमोरील संस्थानचें विहिरीचें पाणी भक्तांस देण्याची व्यवस्था केली आहे.

---

# श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | | किंमत रु. न.पै. |
|---|---|---|
| १) | श्रीसाईसच्चरित (मराठी) | ७·०० |
| २) | श्रीसाईसच्चरित (हिंदी) | ४·५० |
| ३) | श्रीसाईसच्चरित (इंग्रजी) | ४·०० |
| ४) | श्रीसाईसच्चरित (गुजराथी) | ३·७५ |
| ५) | श्रीसाईसच्चरित (कानडी) | ३·०० |
| ६) | श्रीसाईनाथ – स्तवनमंजरी | ०·१२ |
| ७) | दासगणूकृत (४ अध्याय) | ०·५० |
| ८) | सगुणोपासना | ०·२५ |
| ९) | प्रधानकृत साईबाबा शिर्डी (इंग्रजी) | १·०० |
| (१०) | श्रीसाईलीलामृत | २·०० |
| (११) | श्रीसाईसुमनांजलि | ०·०६ |
| (१२) | कीर्तनपंचक | १·५० |
| (१३) | शीलधी | ०·७५ |
| (१४) | साईबाबा अवतार व कार्य | २·०० |
| (१५) | श्रीसाईगीतांजली | ०·१२ |
| (१६) | रुद्राध्याय (११ वा) | ०·१२ |

(पोस्टेज निराळें)

वरील पुस्तकांकरितां खालील पत्यावर लिहावें.

१. सरकारकून, श्रीसाईबाबा **संस्थान**, पोष्ट–शिरडी, जि. अहमदनगर.

२. मुंबई ऑफिस, साई निकेतन, प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.